सप्तर्षी प्रकाशन

# श्यामली

सुरेखा बोऱ्हाडे



# शामली

सुरेखा बोऱ्हाडे

सप्तर्षी प्रकाशन

●

**प्रकाशक**

सौ. कुमुदिनी सिध्देश्वर घुले

सप्तर्षी प्रकाशन,

सप्तर्षी असोसिएट्स ॲण्ड पब्लिकेशन्स

गट नं.८४/२, दामाजी कॉलेज पाठीमागे,

मंगळवेढा, जि.सोलापूर- ४१३३०५

**मोबा.**

●

**मुद्रक**

कृतिका ऑफसेट, मंगळवेढा

●

**मुखपृष्ठ/अक्षरजुळणी**

श्री अविनाश दबडे

●

**मुद्रित शोधन**

श्री विष्णू पावले

●

© अशोक बोऱ्हाडे

●

सर्व हक्क सुरक्षित

आवृत्ती पहिली

३० जुलै २०१७

●

**ISBN: 978-81-933706-9-8**

**मूल्यः ₹ ६०**

माझे प्रेरणास्थान,
नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक
समाजसंस्थेच्या सन्माननीय सरचिटणीस
श्रीमती निलिमाताई पवार यांना आदरपूर्वक अर्पण

# प्रस्तावना

लहान मुलांमधलं बालसुलभ कुतूहल, त्यांच्या कोवळ्या वयातल्या सामाजिक जाणिवा, विशेषकरुन त्यांचं समाजशिक्षण, कुटूंबातले नातेसंबंध या संदर्भात खूप काही करण्याची गरज आहे. त्यांना या सगळ्या गोष्टी शिकवताना त्यांच्या बुद्धीला, विकसित होत असलेल्या मेंदूला झेपेल असं, संवाद व गोष्टीमधून थोडं थोडं ज्ञान दिलं पाहिजे. ते तसं देण्याचा स्तुत्य प्रयत्न शिक्षिका असणाऱ्या सौ. सुरेखा गायखे- बोऱ्हाडे यांनी आपल्या साद'' या पहिल्या पुस्तकात केला होता. आता त्यांचं शामली'' हा मुलांच्या शाळाबाह्य शिक्षणाचा चांगला प्रयत्न आहे.

लहान मुलं निरागस असतात. ती हळवीही खूप असतात. जन्म-मृत्यू मग तो प्राण्यांचा असो की, माणसांचा तो का व कसा होतो, हे त्यांना समजत नाही. म्हणूनच दोन्हीकडच्या शारीरिक वेदनांवर ती हळहळतात, दुःखी होतात. शामली'तल्या गोष्टींमध्ये तर ती कधी हमसून हमसून, तर कधी हंबरडा फोडून रडतातही. कारण आई- वडील व कुटुंबातल्या अन्य माणसांच्या पलीकडे, फारतर घरातला कुत्रा- मांजर या पाळीव प्राण्यांशिवाय अवतीभोवतीच्या लोकांशी, निसर्गाशी, झाडेझुडूपे- वेली व प्राण्यांशी त्यांचा पहिला संपर्क येतो तो प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर, संस्कारक्षम वय सुरु झाल्यानंतर. ते तेंव्हा बाहेरचं काहीतर शिकायला सुरवात करतात. मग मुलं खेड्यात राहत असतील तर त्यांना गोठ्यातल्या गायी-म्हशी, औताला जुंपले जाणारे बैल, शेळ्या- मेंढ्या असे अन्य प्राणी कळायला लागतात. रानातल्या श्वापदांची तोंडओळख व्हायला लागते. त्यांचा अप्रत्यक्ष पर्यावरण अभ्यास सुरू होतो. पण ही सोय शहरांमध्ये नसते. बागबगीचातली, फुलझाडं, वेली किंवा घरी पाळलेली कुत्री- मांजरं अथवा रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट गायी यापुरतीच त्यांची ही निसर्गओळख मर्यादित राहते. बालसुलभ कुतूहल मात्र दोन्हीकडं सारखंच असतं. मग घरी येणारा भाजीपाला नेमका कसा व कुठे पिकतो, दूध कसे तयार होते, प्राण्यांचा लळा म्हणजे काय असतं, वगैरे कधी कधी विनोदाचा विषय बनणाऱ्या चर्चा सुरु होतात. अलीकडं अशी उदाहरणं आहेत, की स्काऊट गाईड किंवा अन्य कोणत्या तरी शिबिराच्या निमित्तानं खेड्यात गेलेल्या मुलांनी पहिल्यांदा शेती पाहिलेली असते. सहलीसाठी डोंगरदऱ्यांमध्ये, पर्यटनाच्या स्थळी गेलेल्या मुलांना तिथली प्रत्येकच गोष्ट नवखी असते. ती हरेक गोष्ट, वस्तू त्यांना मुळात समजावून सांगावी लागते. असं म्हणता येईल की, शहरी

वातावरणात एक वेगळ्या प्रकारचं रितेपण या मुलांच्या आयुष्यात आकार घेत राहतं. कदाचित असंच रितेपण शहरी राहणीमान, मॅनर्स- इटिकेट्सच्या रुपानं ग्रामीण मुलांच्या बालपणातही येत असावं. या पार्श्वभूमीवर परिसर अभ्यासाचं एक नवं दालन सुरेखा बोऱ्हाडे यांच्या पुस्तकानं बालगोपाळांपुढं खुलं केलं आहे. यातल्या हवेच्या, आवाजाच्या, पाण्याच्या प्रदूषणावर बेतलेल्या गोष्टी केवळ छोट्यांचंच नव्हे, तर मोठ्यांचंही प्रबोधन करणाऱ्या ठराव्यात. फटाके उडवणारा, त्यातून चिमुकल्यांना मृत्यूच्या दाढेत ढकलणारा, समारंभ- उत्सवात झाडांवरच्या पक्ष्यांना घाबरवणारा, घरटी उजाड करणारा तो कसला आनंद अन् जिला माता म्हणून पुजायचं तिला प्लास्टीक खाऊ घालणारी, मुक्या जनावरांचे जीव घेणारी ती कसली प्रगती? असे प्रश्न शामली'तल्या गोष्टी अप्रत्यक्षपणं उपस्थित करतात. निसर्ग ओरबडणं, तो कुस्करणं म्हणजेच आधुनिकता, अशा विचित्र व्याख्या तयार झालेल्या निमशहरी वातावरणात, नवमध्यमवर्गाच्या भावविश्वात नेमकी कमतरता कशाची आहे, याचं अत्यंत सुंदर विवेचन, तेही उपदेशाचा आव न आणता, छोट्या- छोट्या बोधप्रद गोष्टींच्या रुपानं शामली'मध्ये आहे.

पण या पुस्तकाचं महत्त्व परिसर अभ्यास व निसर्ग- पर्यावरणाच्या महत्तेपुरतं, बालपणातल्या रित्या कोपऱ्याएवढंच मर्यादित नाही. मानवी नातेसंबंध, तसे पाहता एकत्र कुटूंबात अडगळीत पडल्यात असं वाटणाऱ्या आजी- आजोबांचं महत्त्व अन् झालंच तर दोन किंवा तीन पिढ्यांमधला निखळलेला सांधा, त्याचे उगवत्या पिढीच्या जडणघडणीवर होणारे परिणाम, अशा थोड्याशा गंभीर दृष्टीनंही या पुस्तकाकडं पाहावं लागेल. कुटूंबव्यवस्था हा तसाही भारतीय संस्कृतीचा एक अतिशय महत्त्वपूर्ण जगातल्या प्रगत देशांनाही आदर्शवत असा विशेष आहे. त्यातही एकत्रित कुटूंबपद्धती लयास जात असताना, विभक्त कुटूंबांच्या रुपाने, हम दो- हमारा एक किंवा हम दो, असल्या व्याख्यांच्या स्वरुपात एक आत्मकेंद्री समाज आकार घेत असताना, त्यातून वृद्धाश्रम ही व्यवस्था नव्हे, तर गरज बनत असताना सुरेखा बोऱ्हाडे यांच्या गोष्टीतली मुलं आजी- आजोबांच्या रुपानं एक पिढी ओलांडून मागच्या पिढीस समरस होऊ पाहतात. आपल्याकडच्या बालमानसशास्त्रज्ञांनी, अभ्यासकांनी किंवा समाजवेत्त्यांनीही पुरेसं लक्ष न दिलेली ही बाब आहे. नोकरी, व्यवसायातील गळेकापू स्पर्धेच्या प्रपातात सापडलेले आई- वडील मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. मुलांना वेळ देता येत नाही. त्यांच्या

मनातलं कुतूहल शमवण्यासाठी आवश्यक असलेल्या गप्पांसाठी, त्यांच्या प्रश्नांच्या अखंड मालिकेची उत्तरे देण्याइतका वेळ नसतो. अशा वेळी समजूतदारपणानं किंवा स्पष्ट सांगायचं, तर व्यवहारी बनून मातूल किंवा पितुलाकडच्या आजी- आजोबांना छोट्या कुटुंबामध्ये खूप मानाचं स्थान मिळायला हवं. पण ते मिळत नाही. ही सामाजिक विसंगती व तिला जोडून येणारी गरज शामली'तल्या गोष्टी अधोरेखित करतात.

खरंतर या व अशा अन्य काही वैशिष्ट्यांमुळं शामली'मध्ये आणखी काही गोष्टीही समाविष्ट व्हायला हरकत नव्हती. सुरेखा बोऱ्हाडे यांची शाळाबाह्य शिक्षणातली जाण, त्यांची संवादी, काव्यमय लेखनशैली, एखादी बाब गोष्टीरुपानं सांगण्याची हातोटी यामुळं आणखी गोष्टी लिहिणं तसं त्यांना अवघडही नव्हतं किंवा नाही; परंतु त्यांचा वाचकवर्ग संस्कारक्षम वयातली मुलं ही त्यांनी निश्चित केलेला दिसतो. त्या वयोगटातली मुलं जाडजूड पुस्तकांच्या फारशी जवळ जात नाहीत, हे त्यांनी ओळखलंय. म्हणून एक छोटेखानी गोष्टीचं पुस्तक एवढंच या कलाकृतीचं स्वरूप त्यांनी प्रयत्नपूर्वक ठरवलं असावं. परिणामी या गोष्टीच्या पुस्तकातून मुला-मुलींना दिला जाणारा संदेश गोष्ट छोटी, पण शिकवण डोंगराएवढी, असा ठरतो. त्यामुळं शामली' हा गोष्टींचा संग्रह वर- वर लहान मुलांसाठी असला, तरी तो समरसून वाचला पाहिजे तो त्यांच्या पालकांनी. म्हणजे मोठ्या माणसांनी. कारण मुलांना नेमकं काय द्यायला हवं, कोणत्या गोष्टी टाळायला हव्यात, हे सांगण्याची अधिक गरज मुलांपेक्षा मोठ्यांना आहे. शामली'च्या रुपाने या दोन्ही पिढ्यांची गरज भागतेय, हे महत्त्वाचं.

सुरेखा बोऱ्हाडे यांच्या भविष्यातल्या लिखाणाला
मनःपूर्वक शुभेच्छा!

**श्रीमंत माने**
नाशिक
३० जुलै २०१७

# अनुक्रम


१) शामली ................ ९

२) लग्न ................ १३

३) साद ................ १६

४) आयुष्याचा टी. व्ही. ................ २२

५) दिनू ................ २५

६) अशी घडण ................ ३४

७) दिवाळी ................ ३७

८) सहलीतून नवा विचार ................ ४१

९) आजीची भाजी भाकरी ................ ४५

१०) काकांचा दरारा, बागेला तजेला ......... ४७

११) राखीचे बंधन ................ ४९

१२) मित्र प्रेम ................ ५५



## शामली...

चीर्रर्र चीर्रर्र... असा आवाज झाडीतून आला अन् पियूषने त्या दिशेने बघितलं तर झाडीतून एक निळा पक्षी आकाशाकडे झेपावताना दिसला. गर्द मोरपंखी निळा रंग, लाल चोच, लाल डोळा असा निलपक्षी इतक्या जवळून बघितल्यावर पियूष आनंदून गेला. त्याने त्याच्या आईचे लक्ष त्याकडे वेधले. मध्येच शेतातील बांधावरील गवतफुलावर उडणाऱ्या रंगीबेरंगी फुलपाखरांमागे पळत, तर कधी मोत्या कुत्र्याबरोबर खेळत पियूष थकत नव्हता. आबा आजोबांच्या शेतात तो अगदी रमून गेला होता. या सर्वांत त्याची आवडती गोष्ट म्हणजे गोठ्यातील चितांबरी गाईचे दूध आजी जेव्हा काढते ते बघणे.

गोठ्यात जाताच आजी चितांबरीच्या पाठीवर मायेने हात फिरवत म्हणाली, ''चितांबरी, आज तुला भेटायला कोण आलंय बघ. आपले छोटे मालक पियुष.'' चितांबरीच्या अंगावर सफेद, पिवळे, तपकीरी रंगाचे पट्टे होते. चितांबरीचे भावपूर्ण काळेभोर मोठे डोळे बघून पियूष म्हणाला, ''आजी तुझे बोलणे तिला समजते? तसे ती माझ्याशी बोलेल?''

आजी, 'तर, तिच्याशी प्रेमाने बोल. तिला सगळं समजतं.'' चितांबरीला बघून पियूष हरकून गेला. चितांबरीचा बछडा अगदी डिट्टो तिच्यासारखा होता. पियुष

बछड्याबरोबर खेळायला लागला. आजी म्हणाली, ''अरे पियूष थांब- थांब, आधी त्याला आईचे दूध पिऊ दे. मग खेळ त्याच्याशी.''

बछड्याला मोकळे सोडल्यावर ते गाईच्या सडाशी तोंड लावून लुचू- लुचू दूध पिऊ लागले. त्याचे दूध पिऊन झाल्यावर आजीने त्याला बांधले आणि स्वतः गाईचे दूध चरवीत काढत म्हणाली, ''गाय आणि माय यांचे दूध लेकराला पौष्टिक असते. चल गरम धारौष्ण दूध पी म्हणजे, चांगला ताकतवान, बुद्धिवान बनशील.''

आजी थांब मला चितांबरीशी गप्पा मारायच्या आहेत. बछड्याबरोबर मला खेळायचे आहे.'' पियूषचा पाय काही गोठ्याबाहेर निघत नव्हता. संध्याकाळी त्याचा खुपसा वेळ गोठ्यात जाई. गाईच्या बछड्याला पाणी पाजणे, त्यांना वैरण खायला घालणे, आजोबांबरोबर गोठा साफ करणे, यात पियूषला खूप मजा वाटे.

एक दिवस पियूषचे बाबा म्हणाले, ''गावी आई आबांकडे आठ दिवसाच्या सुट्ट्या कशा भूर्रकन उडून गेल्या समजलेच नाही. चला, उद्या नाशिकला जायला हवे. पियूषची शाळाही सुरु होईल.''

पियुष हट्टाने म्हणाला, ''बाबा, आपण अजून दोन दिवस थांबू, चितांबरीशी मला अजून खुप गप्पा मारायच्या आहेत.''

आई त्याला समजावत म्हणाली, ''पियुष, बाबांचं ऑफीस सुरु झालंय. तुझ्या शाळेची तयारी करायची आहे. अरे, नाशिकलाही गायी आहेत. त्यांच्याशी मैत्री करता येईल.''

पियुष नाखुशीनेच आई-बाबाबरोबर नाशिकला आला. शाळा सुरु झाली. पियुषला आजी- आजोबा, चितांबरीची आठवण होत होती. एक दिवस सकाळी पियुष शाळेचा होमवर्क करत होता. तेवढ्यात त्याला गायीच्या हंबरण्याचा आवाज आला. पियुषला वाटले चितांबरीच आली. तो धावत अंगणात आला, तर काळ्या रंगाची एक व पिवळ्या रंगाची एक अशा दोन गायी त्याच्या अंगणापलिकडे झाडांखाली उभ्या दिसल्या. पियूषने पटकन आईकडून गरम- गरम दोन पोळ्या आणल्या आणि त्या गायींना खाऊ घातल्या. आई पियूषच्या मागे धावत आली, अरे मारेल गाय, जरा जपून'' पण पियुष कसला ऐकतोय.

दुसऱ्या दिवशीही सकाळी त्याच वेळी पियूषला गायीचे हंबरणे ऐकू आले. तो धावत बाहेर आला तर काळ्या रंगाची एकच गाय त्याला झाडाखाली उभी दिसली.

पियूषने तिला गरम पोळी खाऊ घातली. तिच्या तपकीरी गोल मोठ्या डोळ्यांकडे तो बघत बसला. रोजच ती गाय सकाळी येऊ लागली. पियुष तिला पोळी देई. तिच्याशी बोलत बसे. त्याने आईशी बोलून गायीचे नाव शामली ठेवले. आई अग्रहाने त्याला तेथून उठवून शाळेची तयारी करून देई. शामली'ला टाटा करत पियुष शळेला जाई. संध्याकाळी शाळेतून आल्यावर अंगणात शामली नसे. शामली रोजच सकाळी पियूषच्या अंगणात येई. शाळेचा होमवर्क आणि शामलीशी गप्पा असा पियूषचा सकाळचा वेळ जाई. अशाप्रकारे शामलीची आणि त्याची अगदी गट्टी जमली.

एक दिवस शामली आली नाही, तेव्हा पियूषने आईला प्रश्न विचारुन भंडावून सोडले. आई त्याला समजावत म्हणाली, ''अरे ह्या गावभर मोकळ्या फिरणाऱ्या गायी. गेली असेल फिरत दुसरीकडे येईल परत.''

आई, ती काय खात असेल बाहेर?'' पियूषने काळजीने विचारले.

आई म्हणाली, ''अरे बाजारातील उरलेला भाजीपाला, तसेच कचरा कुंडीतील काही अन्न, जे खायला मिळेल ते खाते.'

तीन चार दिवसांनी शामली पियूषच्या अंगणात आली; पण शामली हंबरली नाही. पियुष सवयीने बाहेर डोकावला, तेव्हा शामलीला बघुन आनंदून गेला. आईकडून पोळी घेऊन त्याने ती शामलीसमोर ठेवली. परंतु, शामलीने पोळीला तोंड लावले नाही. शामलीच्या डोळ्यात थंड, शांत भाव होते. चार दिवस शामली का आली नाही म्हणून पियुष तिच्याशी बोलत होता. तिला विचारत होता. परंतू, शामली थंडपणे झाडाखाली बसून होती. पियुषने आईला हाक मारली. आई, ये आई, लवकर बाहेर ये. ही शामली बघ कसं करते आई.'' आई शामलीला न्याहाळून बघत काळजीने म्हणाली, ''अरे पियुष, बघ हिचे पोट किती फुगले आहे? अगदी शांत, सुस्त बसून आहे. पोळीला तोंड लावले नाही. म्हणजे नक्कीच तिचे पोट दुखत असेल.''

पियुष- आई आपण डॉक्टरला बोलावू, शामलीला तपासायला.''

आई म्हणाली, ''तु आधी शाळेत जा. मी बघते काय करायचे ते.'' पियुष शाळेत गेला. अंगणात शामली दिवसभर अन्नाला तोंड न लावता शांत बसून होती. दुसऱ्या दिवशीही शामलीची तीच परिस्थिती होती. शेवटी पियुषचे बाबा जनावरांच्या डॉक्टरला घेऊन आले. त्यांनी शामलीला तपासले व म्हणाले, ''गायीच्या पोटात

प्लास्टीकचा मोठा गोळा निर्माण झाला आहे. अन्न पचन होत नाही. म्हणून पोट फुगले आहे.''

पियुषच्या बाबांनी विचारले, एवढे प्लास्टिक तिच्या पोटात कसे गेले.?''

डॉक्टर म्हणाले, ''अहो, आजकाल प्लास्टिकच्या पातळ पिशव्यांचा बाजारासाठी सर्रास वापर होतो. याच पिशव्यांमध्ये लोक घरातील उरलेले अन्न घालून रस्त्याच्या कडेला टाकून देतात. रस्त्यावर फिरणारी ही जनावरे पिशव्यांसहित ते अन्न पोटात घेतात. प्लास्टीकच्या पिशव्यांचे तुकडे अन्ननलिकेत अटकाव करतात. अन्न पचते; परंतु प्लास्टिक आतड्यांना चिकटते. त्यामुळे प्राण्यांची अशी अवस्था होते. प्राण्यांच्या बाबतीत ही समस्या आजकाल सर्रास दिसतेय.''

पियुष शामलीजवळून हलायला तयारच नव्हता. परंतू, खूप समजावल्यावर तो रात्री झोपायला घरात गेला. सकाळी जागा झाल्यावर पळतच तो अंगणात आला. तर आई- बाबा दोघेही शामलीजवळ उभे होते. शामलीने जमिनीवर मान टाकली होती. पियुष शामलीला हलवून म्हणाला, ''शामली, शामली ऊठ. बघ मी तुझा दोस्त आलोय. आता आई गरम पोळी करेल. तु खा, ऊठ. शामली डोळे उघड. तुझ्या मोठ्या डोळ्यांनी तू माझ्याशी बोल. शामली ऊठ.''

आई पियूषला शामलीजवळून बाजूला घेत म्हणाली, ''पियुष, शामली देवाघरी गेलीय कायमची. ती आता तुझ्याशी बोलणार नाही.'' हे ऐकून पियुषने तर जोरात हंबरडाच फोडला. आई-बाबाही गहिवरले. तेवढ्यात पांजरपोळ येथील सेवकांची गाडी आली. आईने शामलीची पूजा केली. तिच्या तोंडात पोळी ठेवली. सेवकांनी शामलीला गाडीत ठेवले. पियूषचे रडणे काही थांबत नव्हते. आजुबाजूचे लोकही गोळा झाले होते. सर्वांच्या तोंडी एकच होते, माणसाने स्वतःच्या सोयीसाठी तयार केलेल्या प्लास्टिकमुळे अशा मुक्या जनावरांचा हकनाक बळी जातो.'' शामलीच्या मृत्यूमुळे सगळे हळहळत होते.

पियुष दुःखाने, रागाने घरात गेला आणि जेवढ्या प्लास्टिकच्या पिशव्या, प्लास्टिकच्या वस्तू दिसल्या, त्या घराबाहेर फेकू लागला. त्याच्यापासून शामलीला हिरावून दूर नेणाऱ्या प्लास्टिकवर त्याचा संताप उफाळून आला.

☯☯☯



## लग्न

अरे हेमंत, चल आवर, किती वेळ खेळतो टॉमी डॉगबरोबर? त्याचं सगळं खाणं, पिणं तर तू केव्हाच आवरले आहे. आता काय करतोय तू? महेंद्र काकाच्या लग्नसमारंभासाठी आपल्याला निघायचंय, चल आवर'' आई घाईनं काम उरकत म्हणाली.

सुमी मांजरीची लाकडी घरात व्यवस्था लावणारी ऋतुजा म्हणाली, ''आई, अगं हेमंतदाला अजून वेळ लागणार आहे. टॉमी डॉगच्या व्यवस्थेनंतर त्याला अंगणात येणाऱ्या पक्षांसाठी दाणा- पाणी ठेवायचा आहे. दोन दिवस जायचयं ना आपल्याला. माझं काम झालंच आहे. मी मात्र लगेच आवरते. माझा फ्रीलचा गुलाबी फ्रॉक काढला का?''

''अरे, काय म्हणावं तुम्हा मुलांना? मी एकटीच आवरतेय आणि तुमचं चाललंय प्राणी, पक्षी प्रेम. रोजचे ठिक आहे; पण आज बाहेरगावी जायचंय ना! आवरा पटकन.'' आई तनतनली

''झालंच ग, आलो...'' म्हणत हेमंतने माखलेले हात बागेतील नळाखाली धुवून घरात धुम ठेकली. त्याच्या मागे ऋतुजा. मुलांची ही धांदल बघून आईला गंमत वाटली.

गाडी वेगाने चालली होती. ऋतुजा, हेमंत यांचा गाडीत चिवचिवाट चालला होता. दोघेही त्यांची आतेबहिण सौमित्राताईशी दंगामस्ती करत होते. एवढ्या गर्दीतही आई, बाबा आणि आत्या यांच्या गप्पा रंगात आल्या होत्या. मस्ती करतानाही ऋतुजा आपला परी फ्रॉक, हेअर स्टाईल जपत होती. आज त्यांच्या आवडत्या महेंद्रकाकांचे लग्न होते. नवी काकी बघायला मुलं उत्सुक होती. लग्न समारंभात इतर सर्व भावंडे भेटणार होती. म्हणून हेमंतची स्वारी खुष होती. लग्न समारंभासाठी सर्वच उत्सुक होते.

सर्व लग्न समारंभाच्या ठिकाणी पोहचले. गेटवर फुलांची सुंदर सजावट केलेली होती. स्वागतासाठी वधु- वरांकडील मोठी मंडळी हात जोडून उभी होती. हेमंतला पुरुषांनी बांधलेले रुबाबदार फेटे खुपच भावले. पुढे गेल्यावर हेमंतच्या बाबांनाही फेटा बांधण्यात आला. हिरव्यागार लॉन्सवर विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गोरज मुहूर्तावर विवाह होता. समोर विवाह मंचावरील फुलांची देखणी आरास सर्वांचे लक्ष्य वेधून घेत होती. लॉन्सवर उपस्थितांसाठी पांढऱ्या शुभ्र अच्छादित खुर्च्या टाकलेल्या होत्या. मुख्य मंचाशेजारील संगीत मंचावरून मंजुळ सनई निनादत होती. लॉन्सच्या भोवती उंच- उंच मोठी आशोकाची, सुरुची दाट झाडी होती. त्यावर रंगीबेरंगी लाईट्सच्या रांगा सोडलेल्या होत्या. सर्व वऱ्हाडी मंडळी नटून- सजून गप्पांमध्ये मग्न होती. तर वधु- वर पक्षातील जवळच्या व्यक्तींची कामाची लगीनघाई सुरू होती. वातावरण अतिशय मंगलमय, प्रसन्न होते.

हेमंत ऋतुजाला त्याची मावस, चुलत, आते, मामे अशी समवयस्क भावंडे भेटल्याने ते इतके रमले की बाकी जगाचे त्यांना भानच राहिले नाही.

हेमंत उत्साहाने म्हणाला, ''अरे ही हिरवी- काळी गुबगुबीत लॉन्स डनलॉपच्या गादीसारखी वाटतेय. आपण यावर कोलांट्या उड्या मारुयात. मज्जा येईल.!'' झालं इतका वेळ आपल्या नव्या इस्त्री केलेल्या कपड्यांची, मेकअपची काळजी घेणारी मुले, आपण सुंदर दिसले पाहिजे ही गोष्ट विसरुन जाऊन खेळू लागली. हे बघून सौमित्राताईला हसूच आले. पण, बच्चे कंपनीला आता ताईकडे बघायला फुरसत होती कुठे!

महेंद्रकाकांची वरात वाजत- गाजत मंगल कार्यालयाच्या गेटवर आल्यावर मुलं खेळातून भानावर आली आणि प्रवेशद्वाराकडे धावली. नवरदेव महेंद्रकाका व नवरी काकूसोबत चालत, बहारों फुल बरसाओ' या गाण्याच्या धुनबरोबर अगदी थाटात हेमंत,

ऋतुजा आणि इतर मुलं चालत- चालत विवाह मंचावर आली. मुलांना खूप अभिमान आणि गंमत वाटत होती. वधु- वरांच्या मधे अंतरपाट धरला गेला. मंजूळ आवाजात मंगलाष्टके सुरु झाली. सर्व उपस्थित फुलांच्या पाकळ्या, मंगलअक्षदा वधु- वरांवर टाकत होती. मुलांनी तर मंगल अक्षदा वधुवरांवर टाकण्याऐवजी एकमेकांच्या डोक्यावर टाकण्याचा खेळ रंगात आणला. शुभ मंगलऽऽ सावधान' म्हणताच वाजंत्रीवाल्यांनी, उपस्थितांनी एकच जल्लोष केला. उपस्थितांच्या आशिर्वादात वधुवरांनी गलेलठ्ठ पुष्पहार एकमेकांच्या गळ्यात घातले. एवढ्यात फटाक्यांच्या कडकडाटाबरोबरच आकाशात सुंदर आतिषबाजी झाली. वधु- वरांवर खिळलेल्या नजरा आकाशाकडे वळल्या. आकाशात फटाक्यांच्या होणाऱ्या आतिषबाजीच्या आवाजाबरोबरच धुराचा लोळ परिसरात पसरला. सर्वांना ही आतषबाजी रोमांचकारी वाटली. माना उंच करुन सगळे वर बघण्यात गर्क होते. सगळ्यांबरोबर हेमंत आणि ऋतुजाही कौतुकाने आकाशाकडे बघत होते. एवढ्यात, दाट झाडीत दिवसभराच्या धावपळीने निवांत विसावलेले पक्षी फटाक्यांच्या आवाजाने हडबडून, गोंधळून आकाशाकडे झेपावले. तेव्हा पक्षांचा केविलवाणा आवाज आणि प्रचंड आवाजाने घाबरण्यामुळे त्यांची उडालेली धांदल याकडे कुणाचेही लक्ष गेले नाही. परंतु, आतिषबाजी, कडकडाटी आवाज, धुराचा लोळ यामुळे पक्षांच्या झुंडीची झालेली केविलवाणी अवस्था, घाबरुन त्यांनी आकाशात घेतलेली झेप हेमंतच्या काळजाला भिडली. त्याला अतिशय वाईट वाटले. त्याच्या काळजात गलबलले. पक्षांच्या ह्या अवस्थेकडे बघून त्याच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. थोड्याच वेळात सगळे भानावर आले. सौमित्राताई आणि ऋतुजा रडणाऱ्या हेमंतकडे बघायलाल लागल्या. डोळ्यातून पाण्याचे पाट वाहणाऱ्या हेमंतची दृष्टी आकाशात धडपडून उडणाऱ्या पक्षांकडे लागलेली होती. हे बघून सौमित्रा आणि ऋतुजा यांना स्थितीची कल्पना आली. कानठळ्या बसविणारा आवाज आणि धुराचे लोट उठवणाऱ्या फटाक्यांमुळे पक्षांचे झालेले हाल बघून सौमित्राताई आणि ऋतुजालाही गहिवरुन आले. माणूस स्वतःच्या समाधानासाठी, चैनीसाठी निसर्गातील ह्या जीवांचा कधी विचारच करणार नाही का? हा यक्षप्रश्न या बालचमुंच्या मनाला अनुत्तरीत कोड्यासारखा बिलगून राहिला.



## साद

केतकी आणि अंजली हातात हात घालून शाळेला निघाल्या. रेणू समोरच्या खिडकीतून हुरहुरत्या नजरेने त्यांच्याकडे बघतेय. त्यांनी घातलेला शाळेचा ड्रेस, पाठीचे दप्तर, हातातील वाटरबॅग बघून रेणूला त्यांचा हेवा वाटला. कोपऱ्यावर वळतांना त्यांनी रेणूला टाटा केला. रेणूचा चेहरा आनंदाने उजळला. तिनेही मग प्रत्युत्तरादाखल त्यांना टाटा केला. त्या जाताच रेणूचा चेहऱ्यावरचा आनंद मावळला अन् ती कल्पनेत रंगून गेली.

कशी असते शाळा अन् कशा असतात बाई
रंगी- बेरंगी चित्रांच्या पुस्तकांची घाई
मित्र मैत्रिणी करतात धमाल, होईन मी सवाई
खेळात अन् अभ्यासात पहिला नंबर घेईन.''

रेणू, ये रेणू अगं काय बघतेय खिडकीतून. बाहरे इंद्रधनुष्य दिसतंय काय? घरात इतकी कामं पडलीय अन् तू गंमत बघतेय मजेत. चल झाडू घे हातात आधी.'' सुगंधाताईच्या आवाजाने रेणू शाळेच्या स्वप्नरंजनातून भानावर आली. घाबरुन म्हणाली, ''आले, आले ताईसाहेब, आता सारं घर झाडून घेते.''

''अगं सुगंधा, काय त्या एवढ्याशा पोरीवर ओरडत असते? नऊ- दहा वर्षांची तर पोर. तिचं काय वय आहे कामाचं? खेळू दे तिला.'' सुगंधाचे पती रविंद्र तिला समजावत म्हणाले. पतीला दटावत सुगंधा उलट म्हणाली, ''तुम्ही मधे पडू नका. तिच्या आजोबांना वर्षाचे पैसे मोजले आहेत मी. आपल्याला बाहेर जायचे आहे. आवरा तुम्ही. रेणू, हे घे बाळाला. डोळ्यात तेल घालून सांभाळ हो त्याला. घराकडे लक्ष दे, काय?''

रेणू आनंदाने म्हणाली, ''हो ताईसाहेब. बाळ मला खूप आवडतो. सांभाळेल मी त्याला, द्या.''

तेवढ्यात स्वयंपाकाच्या कमलाबाई आल्या. सुगंधा त्यांना म्हणाली, ''कमलाबाई आज स्वयंपाक करायचा नाही. रात्रीच्या दोन पोळ्या आणि भाजी आहे. रेणूचे त्यात भागेल. तुम्ही गहू निवडून ठेवा.''

कमलाबाईंनी होकार भरल्यानंतर सुगंधाबाई आणि रविंद्र कार्यक्रमासाठी बाहेर निघून गेले. रेणू बाळाला झोक्यात घालून गाणे म्हणू लागली,

''झोका हले बाळ हसे
काऊ चिऊ घरी गेले
सगळीकडे शांत गडे
बाळ शहाणा छान निजे.''

बाळ गाढ झोपी गेला. रेणूला परत शाळेत जाणाऱ्या अंजली आणि केतकी आठवल्या. तिलाही शाळेत जायची अनिवार इच्छा झाली. अशातच आजोबांची आठवण येऊन तिला रडू कोसळले. तिच्या हुंदक्याचा आवाज ऐकून कमलाबाई तिच्याजवळ येऊन म्हणाल्या, ''रेणू, पोरी काय झालं तुला? का रडतेय? काही दुखतंय का तुझं?''

रेणू हुंदके आवरत म्हणाली, ''काही दुखत नाही हो मावशी, मला घराची, आजोबांची खूप आठवण येते. मला गावी जायचं आजोबांकडे. ते मला तिथं शाळेत घालतील.''

''अगं बया, आजोबांकडे जायचं! इतक्या लांब गावी. ते कसं शक्य आहे आता. इतरवेळी सुगंधाताईच्या धाकामुळे तुझ्याशी बोलताही येत नाही. कशी गोड पोरगी तू. घरी कोण- कोण असतं गं तुझ्या?'' रेणूच्या चेहऱ्यावरून प्रेमाने हात फिरवत कमळाबाई बोलल्या.

''कमळाबाईच्या प्रेमळ शब्दांनी रेणूची कळी खुलली आणि ती बोलू लागली, घरी फक्त माझे आजोबा असतात.''

''कमळाबाई, आई- वडील...''

आई-वडील मी पाच वर्षांची असतांनाच देवाघरी गेले. सुगंधाताई म्हणजे आमच्या गावच्या जमिनदाराची लेक. त्यांच्या शेतातच आजोबा मजुरीचं काम करतात. मला सांभाळायला कोणी नाही. म्हणून सुगंधाताईंनी मला त्यांच्याबरोबर इथं मुंबईला आणले. तेव्हा त्या आजोबांना म्हणाल्या होत्या, रेणूला शाळेत घालीन. पण, वर्ष झाले येऊन. अजून शाळा नाही पाहिली. मला शाळेत जायला खूप आवडते. मला शाळेत जायचे...'' असं म्हणून रेणू रडू लागली.

रेणूचं रडणे थांबवण्यासाठी कमळाबाई म्हणाली, ''गावी तुझ्या आजोबांनी तुझं नाव शाळेत नाही घातलं का?''

''हो तर, गावी मी अंगणवाडीत जायचे. तेव्हा आई होती. शाळेत जातांना ती माझ्या दोन वेण्या घालायची, डबा द्यायची. मला शाळेत सोडतांना टाटा करायची. किती मजा यायची! नंतर पहिलीची शाळा आमच्या गावापासून आठ-दहा मैल दूर होती. म्हणून मला शाळेत पाठवलेच नाही. आई असती तर तिने नक्कीच मला शाळेत पाठवले असते. पण, आता आई नाही आणि शाळाही नाही...'' असं म्हणत रेणू ओक्साबोक्शी रडू लागली.

कमळाबाईंना समजेना आता रेणूला कसं गप्प करावं. तिची समजूत काढत त्या म्हणाल्या, ''उगी, उगी. रडू नको रेणू. तुला पुस्तक आवडते ना चित्रांचे. उद्या मी घेऊन येईन.''

रेणू रडू विसरुन म्हणाली, ''खरंच! शेजारची अंजली आणि केतकी मला कधी कधी त्यांची चित्रांची पुस्तकं दाखवतात. मला खूप आवडतात ती. त्यांच्याबरोबर मला खूप खेळावं वाटतं. पण घरात खूप कामं असतात. म्हणून खेळताच येत नाही. मी गावी होते तेव्हा खूप- खूप खेळायचे.'' रेणू रंगात येऊन सांगू लागली, सागर-गोट्या, आट्या-पाट्या, सूर- पारंब्या, भातुकलीचा खेळ असे खुप खेळ आम्ही गावातल्या मुली मिळून खेळायचो. किती मजा यायची! खेळण्याच्या नादात खूप उशीर व्हायचा. मग आजोबा यायचे शोधत.''

''कमळाबाई, हो का?''

''हो तर.'' आजोबा तेव्हा रागावत म्हणायचे, कारटे, कुठं- कुठं शोधायचं तुला? खेळात रमली की कशाची सुध राहात नाही बघ तुला. चल घरी.'' मला घरी घेऊन यायचे. स्वतःच्या हाताने भाजी- भाकरी खाऊ घालायचे. आई बाबांच्या गोष्टी सांगायचे अन् स्वतःच रडायला लागायचे. मग मी माझ्या हातांनी त्यांचे आसु पुसायची. माझा कावरा बावरा चेहरा पाहून अचानक जोरात हासायला लागायचे.''

''कमळाबाई, अगं बाई, ते का?''

रेणू सांगू लागली, माझे आजोबा म्हातारे झाले. पण सदा हसतमुखाने काम करतात. शेतात काम करतांना बरोबरच्या मजुरांना गंमती करुन खूप हसवतात. रात्री विठ्ठलाच्या मंदिरात छान भजनही म्हणतात.'' कमलाबाई उत्सुकतेने, असं का?''

मावशी, अहो, आजोबा तरी काय करणार? त्यांना दिवसभर शेतात राब राब राबावं लागतं. मग माझ्याकडे कोण लक्ष देणार? सुगंधाताई म्हणाल्या, ''मी सांभाळेल तिला. म्हणून पाठवले मला. आजोबांची, गावाची खूप आठवण येते. मला आजोबांकडे जायचं.'' म्हणत रेणू रडू लागली.

''उगी, उगी रेणू रडू नको. मी ताईंना सांगेन तुला शाळेत घालायला.''

रेणू उत्साहाने म्हणाली, ''खरंच!''

''होय तर, आता हास बरं. ताईनीं तुला रात्रीची पोळी भाजी खायला सांगितली आहे. चल आधी खाऊन घे. नंतर तुझ्या गावच्या घराविषयी सांग.'' कमळाबाई तिला खुलविण्यासाठी म्हणाल्या.

''खाईन नंतर, गावची आठवण निघाली की भूक पळून जाते माझी. तिकडची हिरवीगार शेतं, त्यामध्ये माझ्या आजोबांची झोपडी. आजूबाजूला भरपूर फुलझाडे अन् त्यावर उडणारी रंगी-बेरंगी फुलपाखरं. मी उडणाऱ्या फुलपाखरांच्या मागे पळत- पळत त्यांना पकडायची. फुलपाखरं उडून जायची आणि मी मात्र गुडघ्यावर धप्पकन पडायची. माझी गंमत बघून आजोबा खुप हसायचे. पटकन मला उचलून घ्यायचे. माझी पापी घ्यायचे, मग मात्र आम्ही दोघं खूप हसायचो... सारा आसमंत आमच्या हसण्याने भरुन जायचा.'' असं म्हणत रेणू हसू लागली.

कमळाबाई म्हणाल्या, ''अगं बास, बास, किती हसशील? ह्या लहान मुलांचं काही कळतच नाही. इतक्यात रडतात, इतक्यात हसतात. श्रावणातल्या ऊन-पावसाच्या सरींसारखं...''

''पावसाचं काय म्हणालात मावशी, मला पावसात खेळायला खुप आवडते. आम्ही मैत्रिणी पावसात फेर धरुन नाचायचो. धमाल यायची.'' रेणूच्या समोर जणू पाऊसच उभा राहिला. एवढ्यात सुगंधाताईंचा चढा आवाज कानावर आला. रेणू ए रेणू. केव्हाची हाका मारतेय. आणि हे काय दार उघडेच ठेवले आहे. घरात पसारा तसाच पडलाय. खेळत बसली होती का?''

''आवरते ताईसाहेब, आवरते.'' असे चाचरत म्हणत रेणू कामाला लागली. सुगंधाताई शांत झाल्यावर कमळाबाई म्हणाल्या, ''गहू निवडून झाले ताईसाहेब. पण, मला काही बोलायचे होते.''

सुगंधाताई म्हणाल्या, ''बोला कमळाबाई पटकन'' बाई, या रेणू पोरीला शाळेची लई आवड दिसते. तिला शाळेत घालायला हवे.''

सुगंधाताई कमळाबाईंना झणकारत म्हणाल्या, ''कमळाबाई, तिला कामाला मदत म्हणून आणलं. शिवाय पोरीची जात. आपलेच आपल्याला जड झालं. कुठे बाहेर गेली आली तर कोण लक्ष देणार? आजकाल पेपरमध्ये काय काय छापून येतं? आज समाजात मुलगी सुरक्षित राहिली नाही. कसं घालायचं तिला शाळेत?''

''ते बी बराबर हाय तुमचं, ताईसाहेब. पण, म्हणून काय मुलींनी शाळेत जायचंच नाय? रेणूला शाळेची खूप आवड दिसते ताई, तिला शाळेत घालाच.'' कमळाबाई समजावत म्हणाल्या.

सुगंधाताईंना मोलकरणीच्या ह्या उपदेशाचा राग आला. त्या चिडून म्हणाल्या, ''पोरगी शिकली नाही तर चालेल. पण, आपल्या डोळ्यासमोर हवी. बाई माणसाच्या जातीला कित्येकदा आपल्या आवडीला मुरड घालावी लागते. मी काही तिला शाळेत घालणार नाही. परत हा विषय काढू नका. एवढा पुळका येत असेल, तर तुम्हीच घेऊन जा तिला घरी. पण, गरिबीमुळे तुम्हाला ही तिला सांभाळणं जमणार नाही. तेव्हा तुम्ही जा तुमच्या कामाला.''

कमळाबाईंचा चांगलाच पाणउतारा झाला. खाली मान घालून कमळाबाई गुमान निघून गेल्या.

एवढा वेळ दोघींचे बोलणे मुकाट्याने ऐकणाऱ्या रेणूला हुंदका फुटला. बाहेर पडणार हुंदका आतल्या आत दाबत रेणू विचार करू लागली, ''म्हणजे मला शाळेत कधीच जाता येणार नाही. कधीच नाही...''

घंटा वाजे घण- घण- घण
पण ऐकू येईना टण- टण- टण
रंगीबेरंगी चिमणी पाखरे
झाडांवरती घेती झुले ।।१।।
पंख गळाले, स्वर थिजला
भावना या कोंडल्या
उडता येईना या चिमणीला
गाता येईना या सोनुलीला।।२।।
स्वप्नात येते रोजच शाळा
खेळणारी मुलं अन् हसऱ्याबाई
खरंच का मी शाळेत जाईन
उघडेल का कधी माझ्यासाठी
शाळेचे ते सुंदर फाटक...
शाळेचे ते सुंदर फाटक....।।३।।

अन् रेणूचा हुंदका बाहेर पडलाच. आपले अश्रू दोन्ही हातांनी पुसत रेणूने स्वगत टाहो फोडला, ''आजोबा, या हो, मला घेऊन जा. मला शाळेत घाला. मला शाळेत जायचं. मी तुम्हाला त्रास देणार नाही. लवकर घरी येईन, घरी काम करेन. पण मला शाळेत घाला हो! आजोबा... आजोबा...''

रेणुपासून दूर.... खुपच दूर अंतरावर असणाऱ्या आजोबांच्या कानी रेणूची ही आर्त साद कधी पोहचू शकेल?

☯☯☯



## आयुषचा टी. व्ही.

आयुषला आईने सकाळी सात वाजता हाक मारली, ''अरे आयूष ऊठ आता, शाळेला जायला उशीर होईल.'' सहा वर्षाच्या इयत्ता पहिलीत जाणाऱ्या आयुषला आईने हातांनी उचलूनच उठवले. बेसिनसमोर मिटल्या डोळ्यानेच आयुषने आईच्या मदतीने ब्रश केला. नंतर टॉयलेटला गेला. अंघोळ तर आईच्या मदतीनेच केली. ऑम्लेटचा नाष्टा अर्धाच कसा-बसा करुन बळजबरी होतेय, अशा थाटात दुधाचा कप रिता केला. धडपडीत गणवेश करून बरोबर आठ वाजता आयूष शाळेत गेला. या सर्व तयारीला आईचाच हातभार. आवरताना मध्येच आयुषची कुरबुर, हट्ट आणि आईचे त्याला समजावणे, तर कधी ओरडणे, हा रोजचाच दिनक्रम.

दोन वाजता शाळेतून आयुषचा पाय घरात पडताच दप्तर बाजूला भिरकावले की टी. व्ही.चे बटन ऑन झालेच समजा. कार्टून सुरु. मग कपडे बदलणे, हात-पाय धुणे याला उशीरच व्हायचा. आईचे लक्ष त्याच्या आवरण्याकडे अन् त्याचं लक्ष कार्टूनकडे. आईने विचारले, ''आयूष, अरे आज शाळेत काय झाले? काय शिकवले?'' तर पठ्ठ्याची नजर कार्टूनमध्येच गुंतलेली. जेवण सुरु होई ते टी. व्ही. समोर. मग काय अर्धे पोटात, अर्धे खाली, तर कधी हातातला घास तोंडात घालायला विसरुन डोळे कार्टूनकडे.

आईने त्याला समाधीतून जागे करत म्हणावे, ''अरे आयुष घास घे, जेव आता.'' असे म्हटले की मग तो पुढचा घास घेणार. असे करत टी. व्ही. समोर जवळ-

जवळ एक तास जेवणाला लागे. नंतर आईच्या रागावण्यामुळे म्हणा किंवा थकल्यामुळे म्हणा आयुष टी. व्ही. बंद करुन झोपायला तयार होई. तरी त्याचे चालूच, आई थांब, एवढा कार्यक्रम होऊ दे, मग बंद करतो.''

झोपेतून उठल्यावरही आईने अभ्यासाला बसवण्याआधीच याचा टी. व्ही. ऑन होई. आई दटावे, ''आयुष आधी होमवर्क पूर्ण कर. मग टी. व्ही. बघ.'' तर हा पठ्ठ्या म्हणे कसा, मिकीमाऊसचा एवढा एपिसोड संपल्यावर बसतो अभ्यासाला.'' आईने खूप समजवल्यावर आयुष होमवर्क पूर्ण करायला बसे. घाईगर्दीत कसातरी होमवर्क पूर्ण करून आयुषचा टी. व्ही. परत सुरु होत असे.

सायंकाळी बाबा ऑफिसमधून आले तरी हा कार्टूनमध्ये मग्नच. बाबा आयुषशी बोलायचे, आयूष, काय केलं दिवसभर? शाळेत काय झालं?'' यावर दुर्लक्ष करत हुं हुं म्हणत आयूष टी. व्ही. मध्ये बुडालेला. बाबांचे मित्र घरी आले. महत्त्वाच्या विषयावर त्यांची चर्चा सुरु झाली. तरी, टी. व्ही. चालू, टी. व्ही. च्या आवाजाने व्यत्यय आल्यामुळे बाबा म्हणाले, ''अरे आवाज कमी कर टी. व्ही. चा.'' पण, आयुषचे लक्ष कुठे आहे बाबांच्या बोलण्याकडे?

बाबा त्याला दटावून म्हणत, ''आयूष, बाहेर मुलांमध्ये खेळायला जा.'' पण हा कार्यक्रम, नंतर तो कार्यक्रम करता करता त्याला वेळ कुठला बाहेर खेळायला जायला. रात्री जेवणाची वेळ होई, जेवण करतानाही टी. व्ही. चालूच. टी. व्ही. बंद केला, तर आयुष चिडचिड करी. रात्री बऱ्याच उशिराने टी. व्ही. बंद करुन आई त्याला बळेच झोपायला लावे.

या अशा दिनक्रमामुळे आयुषला सहा महिन्यांपूर्वीच चष्मा लागला होता. समजावून किंवा रागावूनही तो ऐकत नव्हता. यावरुन तर आई-बाबांमध्ये भांडणे होत. आता मात्र आईने ठाम निर्णय घेतला. टी. व्ही. बंद करून टाकायचा. आईने टी. व्ही. बंद करुन तो खोक्यात बांधून सामानाच्या घरातच ठेवून दिला. आयुषला आणि आईला टी. व्ही. बंद केल्यामुळे खूप त्रास झाला. पण, टी. व्ही. मुळे आयुषवर खुपच विपरीत परिणाम होत होता. मोकळा असल्यावर आयूष चिडचिड करी. कोणतीही गोष्ट पटकन ऐकत नसे. ना धड अभ्यास ना धड जेवण. म्हणून हा कठोर निर्णय आईला घ्यावाच लागला. अर्थात टी. व्ही. वरुन प्रसारित होणाऱ्या बातम्या, काही कार्यक्रम फायद्याचे

असतात. पण, काय करणार महत्त्वाच्या गोष्टी घेण्याऐवजी आयूष कार्टून्समध्येच गुंतला होता.

टी. व्ही. बंद असल्यामुळे आयूष आणि आईला खूपच बेचैन होई, आईने मग दिवसाचे नियोजनच केले. आयूष शाळेतून यायच्या आधीच डायनिंग टेबलवर वर्तमानपत्र किंवा गोष्टीचे पुस्तक जेवणाबरोबरच तयार ठेवू लागली. जेवता जेवता आई त्याला सकाळमधील चिंटू, विनोद, चुटकुले वाचून दाखवी. काही चांगल्या बातम्या सांगू लागली. रात्री झोपतानाही आई त्याला रोज नवी गोष्ट ऐकवी. आयुष दुपारी होमवर्क पूर्ण करी. सायंकाळी सहा वाजता आईबरोबर फुटबॉल घेवून तो बागेत जाऊ लागला. प्रथम आयूष आईबरोबर फुटबॉल खेळे. हळूहळू बागेत फुटबॉल खेळण्यासाठी त्याच्या वयाच्या मुलांची टीमच तयार झाली.

आई म्हणत असे, ''आयूष चल आता घरी. खेळून खूप दमला आहेस. मलाही कामं आहेत घरात.'' त्यावर आयूष म्हणे, ''आई, मित्रांबरोबर खेळून किती आनंद मिळतो. किती मज्जा येते. मला अजून खूप खेळायचे आहे.'' आई त्याला समजावत म्हणे, ''अरे मित्रांसोबत कितीही खेळले, तरी मन भरत नाही. उद्या परत येऊ. आता चल.''

दमून-भागून तरीही प्रसन्न मनाने आयूष घरी येत असे. घरी आल्यावर गरम पाण्याने आंघोळ करून घरचे कपडे घालून देवासमोर तो परवचा म्हणे. त्यानंतर अभ्यास, चित्र काढणे, रंगवणे, बाबांबरोबर गप्पा असा आयुषचा दिनक्रम सुरु झाला. जेवण करुन आयूष लवकर झोपत असे. दुसऱ्या दिवशी लवकर उठण्यासाठी... नव्या दिवसाची नवी स्वप्ने पाहण्यासाठी...

☯☯☯



## दिनू

आजोबा मी आलो. कुठे आहात तुम्ही?'' दिनेशचा उत्साही आवाज ऐकून वर्तमान पत्र बाजूला ठेवून आजोबा दिनूला सामोरे आले. तेव्हा लटक्या रागाने दिनेश म्हणाला, ''हे हो काय आजोबा, तुम्ही आज लपला का नाही? मी तुम्हाला बरोबर शोधले असते.''

आजोबा त्याला समजावत म्हणाले, ''लक्षातच राहिले नाही बघ आज लपायचे. पण, काय रे लबाडा! आज वेळ झाला तुला यायला.'' हो, स्कूल बस आज उशिरा निघाली. आजी, ए आजी कुठे आहेस गं तू? हे बघ मी आलो. माझं चॉकलेट दे बरं आधी.'' कमरेवर हात ठेवत वाकत वाकत पुढे येत आजी कापऱ्या आवाजात म्हणाली, ''अरे हो आले, आले. माझ्या सोनुल्या दमला असशील. चल कपडे बदल आधी, तोंड हात- पाय पाण्याने स्वच्छ कर. जेवण गरम करून जेवायला वाढते.''

फुरगंटून दिनू म्हणाला, ''जेवण नाही न काही नाही. आजी तू ऐकले नाही. आधी माझं चॉकलेट दे बरं.''

''आजी, अरे, विसरलेच की, मी! आज चॉकलेट आणायचं राहून गेलं. त्याचं काय झालं दिनू, आज मी फिरायला बाहेर पडलेच नाही ना!''

''कमालंच आहे तुमची. आज तुम्ही दोघेही विसराळू झाले आहात का? असे शांत शांत दिसतांय तुम्ही.'' दिनू त्यांना न्याहाळत म्हणाला. दिनू बाळ आता आम्ही म्हातारे झालो. लागलो विसरायला बऱ्याच गोष्टी. शरीरही थकले बघ. तू आवर बरं

आधी.'' हे काही बरोबर नाही आजोबा. रनिंग रेस लावल्यावर तुम्ही अजूनही माझ्या बरोबरीनं पळतात. कधी कधी मलाही हरवतात आणि आता म्हणता, म्हातारे झालोत.'' हसत हसत दिनू म्हणाला.

''दिनू, ए दिनू, कधीचा आलास. आवरायचं सोडून गप्पा काय मारत बसलाय. तुझ्या आजी- आजोबांना काही काम नाही. पण, तुला ड्रॉइंग क्लासला जायचे आहे. आटोप पटकन.'' चढ्या आवाजात निकिता म्हणाली. त्यावर नाराज होत दिनू आत गेला. चिडून निकिता म्हणाली, ''तुम्हा दोघांना कितीदा सांगितले, त्याच्याशी खेळत बसू नका. पण, तुम्ही ऐकता कुठे? अशानं त्याचा अभ्यास राहतो.''

तिला समजावत आजी म्हणाली, ''अगं सुनबाई, आम्ही आज त्याच्याबरोबर अजिबात खेळलो नाही. पण तो ऐकेचना.''

''तो एक लहान, पण तुम्हाला कळायला नको.'' निकिता फणकारत आत निघून गेली. हताश होत आजोबा म्हणाले, ''आपण काही केलं तरी चुकल्यासारखंच दिसतं.''

आजी आजोबा दोघं गप्प बसून होते. तेवढ्यात ऑफिसहून दिपक आला. ''काय झाले आई, इतके शांत का बसलाय तुम्ही? दिनू शाळेतून आला का?'' आजोबा, हो आला.'' मग आज घर इतकं शांत का?'' दिपकने विचारले.

''आवरतोय तो आत.'' आजोबा.

दिपक म्हणाला, ''मग काय ठरवलं तुम्ही? लोणावळ्यासारख्या सुंदर ठिकाणी राहायला आवडेल तुम्हाला!''

''आम्ही काय ठरवणार? तुम्ही म्हणाल तसं.'' आजोबा.

''पण, दिपक मी म्हणते....'' आजी. तेवढ्यात मध्येच येत निकिता तिला अडवत म्हणाली, ''तुम्ही काही म्हणू नका सासूबाई. एकदा जे ठरलं ते ठरलं. सगळ्यांच्या सोईसाठी हे योग्यच आहे.''

हताश होत आजोबा म्हणाले, ''जशी तुझी इच्छा, तयारी करतो आम्ही.''

आजी काकुळतीला येत म्हणाली, ''अहो, असं काय म्हणता? घरातून पाय निघत नाही. शिवाय दिनू अजून लहान आहे.''

पत्नीला समजावत आजोबा म्हणाले, ''अगं ऐक आता, मोह तो किती धरायचा संसाराचा? आता वानप्रस्थाश्रम स्वीकारणे योग्यच. विठ्ठल, विठ्ठल...''

''उद्याचा दिवस ठरला आहे जायचा, पत्र आलं आहे विश्रामालयाचं. मग करायची तयारी. मी उद्या रजा घेतली आहे.'' दिपकचा आवाज दबला होता. आवाजात उत्साह आणत आजोबा म्हणाले, ''हो तर, उद्या तर उद्या. चला लागा तयारीला. अगं ऐकलं का, आवश्यक तेवढ्या गोष्टी घे सोबत. उगाच फाफट पसारा नको. काय?''

''आजी, अहो, पण दिनूला कसे समजावणार?''

निकिताचे उत्तर तयार, त्याची काळजी करु नका सासूबाई. त्याला मी जन्म दिलाय. मी बरोबर सांभाळीन. तुम्ही आता तुमची काळजी घ्या.''

''चला बरीच कामं पडलीय. ठरलं तर मग आई- बाबा आपण उद्या सकाळी निघूया.'' म्हणत दिपक आत गेला, तशी निकिताही त्याच्या मागे गेली.

आजी- अजोबा आपल्या छोट्याशा रुममध्ये, आपली सामानाची बॅग भरु लागले. कपडे, स्वेटर, काही पुस्तके, कुटुंबाचे फोटो. तेवढ्यात दिनू पळत त्यांच्या रुममध्ये आला. त्यांची आवरा आवर बघून म्हणाला, ''आजोबा तुम्ही कुठे गावाला निघालात? मीही येईन तुमच्यासोबत.''

आजोबा त्याला जवळ घेत म्हणाले, ''नाही रे माझ्या राजा. आम्ही जिथे चाललोय, तिथे फक्त म्हातारी माणसेच जातात. मुलांचे तिथे काम नाही. तू आपला चांगला अभ्यास कर. खूप मोठा हो.''

''तेवढ्यात निकिता आली, दिनू चल झोपायला.''

''दिनू, आई मी आजी आजोबा जवळच झोपेल. आजी मला छान गाणं म्हणते.''

निकिती चिडून म्हणाली, ''दिनू दिवसेंदिवस तुझे मॅनर्स बिघडताहेत. तू आता लहान राहिला नाही. दहा वर्षांचा झालास. तुला स्वतंत्र खोलीत झोपण्याची सवय झाली पाहिजे. फार लाडावून गेलाय तू.''

दिनू रडक्या आवाजात, ''नाही, मला आजी-आजोबांजवळ झोपायंच. मला एकटं झोपायची खूप भीती वाटते. स्वप्न पडतात, अक्राळविक्राळ भूतांची.'' त्यावर निकिता सासू-सासऱ्यांकडे बघत दिनूचा हात ओढत म्हणाली, ''नाही त्या गोष्टी ऐकतो अन् मग पडतात अशी स्वप्ने. चल मुकाट्याने झोपायला.''

दिनू आजीला पकडून रडत म्हणाला, ''नाही आज मला आजी-आजोबांजवळ झोपायचे.''

आजी म्हणाली, ''सुनबाई एक एवढं. आजच्या दिवस तरी झोपू दे त्याला आमच्याजवळ.''

बरं, उद्यापासून तरी त्याला शिस्त लागेलच.'' असे नाईलाजाने म्हणत निकिता निघून गेली.

''या... हु! आजी, माझी आज्जी,'' म्हणत दिनूने आजीला मिठी मारली. आजोबांनीही त्याला मिठीत घेण्यासाठी हात पसरवला. दिनू पळत आजोबांना मिठी मारत म्हणाला, ''माझे आजोबा.''

''लबाड! हे काय आजीकडे असतो तेव्हा माझी आजी, अन् माझ्याकडे आल्यावर म्हणतो माझे आजोबा. तुला जास्त कोण आवडते रे.''

दिनू खुष होत म्हणाला, ''मला तुम्ही दोघेही खूप- खूप आवडतात. आजी माझ्या केसांवरून हात फिरवून नेहमीचं गाणं म्हण ना.!'' आजी गादीवर बसून दिनूचे डोके मांडीवर घेत त्याच्या केसांतून प्रेमाने हात फिरवत गाणे म्हणू लागली...

दिन सरला, रजनी आली
सारीकडे बघ, शांती झाली.
रजनीची ही रंगत न्यारी
रातराणी ही सुगंध शिंपडी,
चंद्राच्या दुधाळ आभांची
घाली दुलई मखमली
आईच्या उबदार कुशीत
बाळ माझा जाई झोपी''

आजी दिनूला थोपटत असताना दिनू अर्धवट झोपेत गेला. गाणे संपले तसे आजीला रडू फुटले. त्या आवाजाने दिनूला जाग आली. त्याने आजीला काळजीने विचारले, ''काय झालं गं आजी? का रडतेयस तू? काही दुखतंय का तुझं? औषध आणू?''

आजोबा पत्नीला समजावत म्हणाले, ''अगं, इतकी भावनाविवश होऊ नको चांगली झोप लागली होती दिनूला. बघ उठला तो.''

''आजी त्याला कुरवाळत म्हणाली, ''दिनू बाळा झोप तू''

दिनू परत भरलेल्या बॅगांकडे पाहत म्हणाला, ''आजोबा- आजी तुम्ही उद्या कोणत्या गावाला चालले. मला घेऊन चला ना तिथे.''

त्याला समजावत आजोबा म्हणाले, ''अरे मुलं कशी होस्टेलला राहायला जातात. तसेच आम्ही पण होस्टेलला राहायला जाणार आहोत.''

दिनू म्हणाला, ''आजोबा मुलं शिकण्यासाठी जातात होस्टेलवर. तुम्हाला काही शिक्षण घ्यायचे आहे का?''

आजोबा शुन्यात नजर लावत म्हणाले, ''हो रे बाबा, या दुनियेच्या अजब शाळेत शिक्षण कधी पूर्णच होत नाही.'' दिनू म्हणाला, ''आजोबा मलाही यायचं तुमच्याबरोबर होस्टेलवर राहायला.'' आजी त्याला समजावत म्हणाली, ''नाही रे राजा, तिथं लहान मुलांना प्रवेश नसतो.''

दिनूने निरागसपणे विचारले, ''तिथे जाऊन तुम्ही काय करणार?''

आजोबा समजाऊ लागले, तू जसा आमचा दोस्त आहेस की नाही, तसे तिथं आमच्या सारखीच बरीच मित्र मंडळी असणार. आम्ही सर्व एकत्र फिरायला जाणार. पोथी वाचणार, खूप गप्पा मारणार आणि खूप हसणार, दुसरं काय?''

दिनूला गंमत वाटली, तो म्हणाला, ''अरे व्वा! हो, मग मज्जाच. पण, तुम्ही किती दिवस राहणार तिथं? लवकर परत या.''

हो, हो, लवकर परत येऊ.'' आजी त्याला कुरवाळत म्हणाली.

दिनूचा पुन्हा प्रश्न, तुम्हाला माझी आठवण येईल?''

आजी त्याला मायेने थोपटत व्याकूळ होत म्हणाली, ''हो तर, माझ्या राजा. तिथं तुझ्याशिवाय दुसरं काही आठवणारच नाही बघ, झोप आता. उद्या शाळा आहे तुझी.''

काही दिवसांनंतर दिनू शाळेतून आला तो ओरडतच, ''आजोबा... मी आलो. आज्जी... आज्जी, कुठेयंस तू?''

बाई म्हणाली, ''दिनू, केवढ्यानं ओरडतोय. आजी- आजोबा आता घरात नाही.'' ओशाळून दिनू म्हणाला, ''अरे हो, मी विसरुनच गेला. सवयीने ओरडलो.''

बाई, बरं बरं... आवरुन घे दिनू. मी कधीचं जेवायला वाढले आहे. जेवून घे. मला दुसरी कामं आहेत.''

''दिनू, आई कधी येणार आहे हो काकू?''

''बाई, आज बाईसाहेबांना यायला उशीर होणार आहे. तु तुझं आवरुन अभ्यासाला बैस.''

दिनू, शाळेत अभ्यासच तर करुन आला. ''मला खेळायचं आहे. काकू तुम्ही माझ्याबरोबर खेळाल? तुम्ही बॉल टाका मी बॅटने उडवतो.''

''नाही रे बाबा, मला खूप कामं आहेत.'' बाईसाहेबांनी ठरवल्याप्रमाणे सर्व झालेच पाहिजे. तू आधी अभ्यास कर नंतर खेळ'' असं म्हणून बाई आपल्या कामाला गेल्या. दिनू हताश झाला. त्याच्या मनात आले, आता मी कोणाबरोबर खेळणार? कुणाबरोबर गप्पा मारणार? शाळेतल्या गंमती जंमती कुणाला सांगणार? आजोबा आजी होते तेव्हा किती धमाल यायची. माझ्याबरोबर आजी- आजोबा गप्पा तर मारायचेच; खेळायचे सुद्धा. माझा अभ्यासही घ्यायचे.

तेवढ्यात बाई आल्या न् म्हणाल्या, ''दिनू बाबा, एकटाच काय बसलास शून्यात नजर लावून. तुला खेळायचं असेल, तर कम्प्युटरवर गेम खेळ. नाहीतर टी. व्ही. वर कार्टून बघ.'' भानावर येत दिनू म्हणाला, ''नाही, नाही. आजोबा मला कम्प्युटर, टी. व्ही. अर्ध्या तासाच्या वर कधीच बघू द्यायचे नाही. तेच माझ्याबरोबर खेळायचे. माझा अभ्यास घ्यायचे. पण, आता...''

दिनूच्या मनात आले,

''बॉल कुठे? अन् बॅट कुठे?
घर हे सारे सुने सुने
हास्याचे ते कारंजे,
मायेचे ते हात कुठे?''

आजोबा-आजीच्या आठवणीत दिनू हरवून गेला. त्याला हलवून बाई म्हणाल्या, ''दिनू बाबा टी. व्ही. लाव थोडावेळ, मी पाहते टी. व्ही. तुझ्यासोबत तेवढाच मलाही विरंगुळा...''

''बरं लावतो टी. व्ही.'' दिनू म्हणाला.

दिवस जात होते. शाळेतून आल्यावर दिनू टी. व्ही. वर कार्टून, पिक्चर पाहात राही. नाहीतर कम्प्युटर गेम खेळत राही. गारपटक, गुळगुळीत जेवणामुळे तो ताटातील अन्न तसेच उष्टे टाके. कामवाल्या बाईंना त्याचे कामं औपचारिकरित्या आटोपण्याची घाई होई.

एक दिवस दिनूचे बाबा, दिपक आपल्या पत्नीला म्हणाले, ''निकिता, तुझ्या लक्षात आले का आपला दिनेश आता अगदी शांत शांत असतो''

निकिता म्हणाली, ''हो तर, सुधारलाय आता तो. मामंजी आणि सासुबाईंच्या लाडाने तो खूपच लाडावला होता. आजीबात ऐकत नव्हता. आता कसं सगळं ऐकतो. शांत झाला आहे तो.''

''दिपक, अगं, तसं नाही, आताशी तो माझ्याबरोबर मस्ती करत नाही, खेळत नाही. गप्पा मारत नाही.''

निकिता समजावण्याच्या स्वरात म्हणाली, ''अहो तो आता शहाणा झालाय. अभ्यासाला लागला. शाळेतून आल्यावर स्वतःचं आवरुन अभ्यासाला बसतो. तसं कामवाल्या बाई मला सांगत होत्या.'' यावर दिपक परखडपणे म्हणाला, ''अगं, पण मागच्या टेस्टपेक्षा ह्या टेस्टमध्ये त्याचे मार्क्स कमी आले.''

''बरोबर आहे, पण अभ्यास वाढतोय. तो प्रयत्न करतोच आहे.'' निकिता म्हणाली.

दिपक काळजीने म्हणाला, ''अगं परवाच त्याच्या डोळ्याचं चेकअप केले. चष्म्याचा नंबर वाढला आहे बघ.'' आता निकिताचाही सुर काळजीयुक्त झाला, हो काळजी वाटतेय बघा, त्याचं सध्या जेवणाकडे लक्ष नसते. भाज्या खात नाही. फळं खात नाही.''

''म्हणूनच त्याची तब्येत रोडावली आहे. वजनही कमी झालं आहे.'' दिपक म्हणाला. निकिता तरीही त्यालाच समजावत म्हणाली, ''काहीतरीच तुमचं. अहो वाढतं वय आहे. उंची वाढते आहे, म्हणून वजन कमी वाटते.'' त्यावर दिपक मनातले बोलला, ''निकिता काहीही म्हण, पण मला वाटते, आई-बाबा वृद्धाश्रमात गेल्यापासून दिनू शांत शांत राहतो. काहीतरी विचार करत असतो.''

''काहीतरीच तुमचं. दिनू टी. व्ही. बघतो, कम्प्युटर खेळतो. मजेत आहे तो. मला तर वाटतं दिनूपेक्षा तुम्हालाच तुमच्या आई-बाबाची जास्त आठवण येते आहे.'' निकिता.

दिपक दुःखी स्वरात म्हणाला, ''निकिता अगं, माझे आई- वडीलच आहेत ते. मला त्यांची आठवण येणारच.''

त्याला पुन्हा समजावत निकिता म्हणाली, ''सुखात असतील ते. त्यांनी तरी किती दिवस कामं करायची. वृद्धाश्रमात त्यांना त्यांच्या बरोबरीच्या सोबत्यांच्या सहवासात मनमोकळं जीवन जगता येईल. नाहीतर आयुष्यभर नोकरी, संसार, मुलं आणि आता नातवंडं... त्यापेक्षा वृद्धाश्रम बरा.''

त्या दोघांचं बोलणं दाराबाहेरुन ऐकणारा दिनू अचानक येऊन निकिताला चिकटत रडक्या आवाजात म्हणाला, ''आई, आई... तुम्ही म्हातारे झाल्यावर मी तुम्हाला वृद्धाश्रमासारख्या होस्टेलवर जाऊ देणार नाही. तुम्ही खुप कामं केली तरी माझ्यापासून तुम्हाला दुर जाऊ देणार नाही.''

दिपक आश्चर्यचकीत होऊन म्हणाला, ''दिनू बाळा, अरे हे काय बोलतोस तू?''

दिनूचा आवाज आता रडवेला झाला, हो, मला आजी-आजोबांची खूप आठवण येते. मी खरंच सांगतो, त्यांनाही माझी खूप आठवण येत असणार. आजी आजोबांना मी माझं काम करायला नाही सांगायचो. आजीच माझ्यासाठी खूप दमायची. वेळेवर गरम जेवण करुन गोष्ट सांगत भरवायची. आता मला जेवावंसंच वाटत नाही.''

''अरे दिनू....'' निकिता काहीतरी बोलणार, तेवढ्यात तिला मध्येच तोडत दिनू काहीतरी आठवल्याप्रमाणे पुन्हा म्हणाला, ''आणि हो, आजोबा माझ्याबरोबर खेळायचे तेव्हा खूप धमाल यायची. आता मला खेळावंसंही वाटत नाही.''

दिपक त्याला समजावत म्हणाला, ''दिनू, अरे मी खेळेन तुझ्यासोबत. पण, तू मला खेळायला बोलावत नाही.''

दिनू तक्रारीच्या स्वरात म्हणाला, ''बाबा, तुम्हाला वेळ कुठं असतो खेळायला? जेव्हा पहावं तेव्हा लॅपटॉपवर काम करत असता.''

निकिता त्याला प्रेमाने गोंजारत म्हणाली, ''अरे पण, आम्ही दोघं आहोत ना तुझ्यासाठी.'' त्यावर दिनू हट्टाने म्हणाला, ''ते काही नाही. तुम्ही दोघे खूप उशिराने घरी येता. मी खुप एकटा- एकटा असतो. मला आजी- आजोबा हवेत.''

त्याचे हे उत्तर ऐकून दिपक आणि निकिता एकमेकांकडे बघतच राहिले. तरीही निकिताने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, अरे, ते दूर आहेत आता परत येऊ शकणार नाही.''

दिनू रडक्या आवाजात म्हणाला, ''आई- बाबा, तुम्ही म्हातारे झाल्यावर तुम्हीही होस्टेलवर जाणार? तेथे तुम्हाला माझी आठवण होणार नाही का? माझ्याशिवाय तुम्ही तिथं राहू शकाल? तिथे जर आजी आजोबांना दुखलं- खुपलं तर त्यांच्याकडे कोण पाहणार? इथं आजोबांचे डोके दुखायचे तेव्हा मी डोकं दाबून द्यायचो. तेव्हा आजोबा म्हणायचे, तुझ्या हातात जादू आहे बघ. डोकेदुखी झटपट पळाली आणि आजी तर म्हणायची, माझा दिनू बाळ, माझा सोनुला समोर असला, तर माझं सगळं दुखणंच पळून जातं. मला तर त्यांची खूप काळजी वाटते. आता तिथं एवढ्या दूर त्यांच्याकडे कोण बरं लक्ष देत असणार?''

''अरे, पण दिनू...'' दिपक काही बोलणार, तेवढ्यात दिनू आई-बाबांचे हात आपल्या हातात घेत म्हणाला, ''म्हणूनच म्हणतो मी, तुम्ही म्हातारे झाल्यावर मी तुम्हाला कुठल्याही होस्टेलवर, वृद्धाश्रमात राहायला पाठवणार नाही. नाहीतर मी अगदी एकटा पडेल....'' असं म्हणून त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहायला लागल्या. दिपक आणि निकिता हतबल होऊन त्याच्याकडे पाहातच राहिले.

☯☯☯



## अशी घडण

बॅटरीच्या प्रकाशझोतात सोनूची इवलीशी अनवाणी पावलं रात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात ओलसर गवताळ बांधावर सपासप पडत होती. तश्याच स्टेजवरच्या झगमगत्या प्रकाश झोतात सोनूचा चेहरा प्रकाशाने उजळला होता आणि तो ताठ मानेने बोलत होता. त्याच्या शेजारी बसून मी ही खूप समाधानाचा अनुभव घेत होतो. आज तो आय. पी. एस. अधिकारी झाला होता. एक भिल्ल समाजाचा, गड्याचा मुलगा आय. पी. एस. अधिकारी झाला होता. त्याच्या चेहऱ्यावरचा दिव्याचा प्रकाश बघून मला त्याचे बालपण आठवले. त्याबरोबर त्याच्या तोंडची गोड वटवट ही आठवू लागली. सोनूला मी आलो की किती बोलू अन् किती नको असं होत असे. बाबा... बाबा...'' करत दिवसभराच्या कितीतरी हकीगती अन् मनातल्या भाबड्या गोष्टी आठ वर्षांचा सोनू घडाघडा घड्यातील पाणी आंघोळीला डोक्यावर ओतल्यागत माझ्यावर ओतत असे. त्याच्या बोलण्याची पद्धत अन् आवाज मला शिवालयातील गाभाऱ्यातील शांतता अन् सुख देत असे. कितीतरी वेळ त्याचे बोलणे ऐकत राहावे, असे वाटे.

सोनू म्हणजे शेतात आत्ताच नव्याने आलेल्या गड्याचा मुलगा. नुकताच जवळच्या बालवाडीत माझ्या म्हणण्यामुळे जाऊ लागला.

''ती बघ बेंडकुळी, टणाटण उड्या मारते'' मध्येच बॅटरीच्या प्रकाशाचा झोत माझ्या पायाकडे वळवी, बाबा तुला दिसतंय ना, नाही तर माझा हात धर. चल, आपणच लगालग ह्या उदबत्त्या देवळात लावून येऊ. माझ्या बाला मीच आठवण देतो.

बाबा ओरडेल असं भ्या दाखवलं तर तो देवाला उदबत्ती लावतो. बाबा ती बघ अजून एक बेंडकुळी.''

रात्रीच्या अंधारात बेंडकुळ्या ह्या पोराला बरोबर नजरेत येत. आपणही शेतात फिरतो, पण आपल्याला दिसत नाही. पोराची नजरच तीक्ष्ण. मी तर घाबरलोच. न जाणो एखादा साप असावा, बेंडकोळीला पकडायला. पण, पोरगं न घाबरता चालत होतं.

एकदा असंच रात्रीच्या वेळी लिफ्टचे पाणी सुटले होते. वावराला पाणी चालू होते. एका खांबावर एक चाळीसच्या बल्बच्या उजेडात गडी पत्ते खेळत होते. मीही त्यांच्याबरोबर वेळ जावा म्हणून खेळायला बसलो. उजेडात मला पत्ते दिसतील, अशा बाजूला मी बसलो होतो. दोन गडी, एक सोन्याचा बाप व दुसरा त्याचा मित्र अंधाराच्या बाजूला बसलेले. त्यांची नजर अंधाराला खरंच सराईत झालेली असते. पत्ते बरोबर दिसतात. खेळता-खेळता अचानक माझ्या पाठीवर थप्प असं वाजून काहीतरी पडलं. मागून दगड फेकायला तर रात्रीचं कोणी नव्हतं. काय पडलं म्हणून तिरका होऊन पाहिलं तर एक बेडकी माझ्या अंगावर पडल्याने तिला पकडण्यासाठी तिच्यावर झेप घेणारा, तोंडाचा भला मोठा आ वासलेला साप नजरेत पडला. साप- साप म्हणून मी जागीच काना झालो. साप मला घाबरला.... मी सापाला. गड्यांनी मला एका बाजूला ओढलं. साप ही दिसेनासा झाला. मोठाच अनर्थ टळला. अशाच रानात सोन्या मात्र न घाबरता बॅटरीच्या उजेडात तोंडाची टकळी चालवत चालत होता. ''बाबा, अरं तुझं लक्षच नसतं. येणारी-जाणारी माणसं चोरून मक्याची कणसं भाजून शेतातच खातात. बाचंही शेताच्या ह्या मेराकडं लक्ष नसतं. त्या लोकांना अद्दल घडवायलाच पाहिजे.''

त्याचे बालसुलभ बोलणे आणि त्याला बघण्यात मला मोठे सुख मिळे. ऊसाच्या शेताच्या बांधावरुन चालत होतो. एका बाजूला मका अन् दुसऱ्या बाजूला ऊस होता. मधल्या बांधावरुन जातांना ऊसाने पानं करपलेली दिसत होती. मी सहज म्हटलं, ''अरे सोन्या, ऊस जळतोय जणू. काय कारण असावं रे!''

''बाबा, अरे एवढा मोठा झाला, तुला समजत कसं नाय, रानाला पाणी कमी पडतंय. म्हणून ऊस जळतोय. पाणी लवकर पडला पाहिजे.'' एवढ्याशा पोराचं निरीक्षण, विचार बघून आचंबा वाटे.

''मळ्यात गेलं की बाबा... बाबा.... करत हाफ चड्डी, मळलेला लांब बाहीचा शर्ट, त्याच शर्टाच्या बाहीने नाकातून वाहणाऱ्या धारा पुसत, खूप काही सांगण्याच्या

उर्मीने लकाकणाऱ्या, बोलक्या डोळ्यांचा धावत येणारा सोनू पाहिला की मी आपोआप खुश होत असे. सारं रान सोनुसारखं उत्साहाने भरलेलं वाटे. दोन चॉकलेट हातावर ठेवल्यावर तर महाशय एकदम खुश होत असे. दिवसभरातल्या कितीतरी हकिगती मग त्या माणसांच्या असो की रानाच्या पक्षांच्या, अशा कितीतरी गोष्टी आठ वर्षाचा सोनू सांगत असे. शेतातील कामांची पाहणी करत, गड्यांना सूचना देत चक्कर पुरा होत असे. तेवढा वेळ तोही मागे मागे फिरत टकळी चालू ठेवी.

एका प्रसंगाने मात्र त्याच्या आयुष्याला वळणच दिले. असाच एकदा त्याच्या बापाला, रामुला मी शेती कामासंबंधी सूचना देत होतो. काल रामू खूप प्याला होता. त्यावरुनही मी त्याला सुनावत होतो. तेवढ्यात हे ऐकणारा सोन्या मध्येच बोलला, ''बाबा अरे आम्ही भिल्लाटी आहे तर आहेच; पण तुही गावातला भिल्लाटी आहे.''

मला त्याच्या बालसुलभ बोलण्याचं काही वाटलं नाही. मीही कधीतरी पितो... हे त्याला ऐकून माहित होते. पण, त्याच्या स्पष्टोक्तीमुळे त्याच्या माय-बापाला मात्र कानकोंडं झालं. त्याच्या मायनं त्याला फराफरा ओढंत झोपडीत नेलं अन् दणादण कुटायला सुरुवात केली. त्याला मी त्याच्या मायच्या तावडीतून सोडवलं, तसं ते मला चिकटलं. त्याची माय रागातच बडबडत होती, ''काय करावं ह्या पोराला. लई अगाव झालंय. काय बी बोलतंय. लहान पहात नाही कि मोठं काही नाय. दिवसभर हिंड हिंड हिंडतं आणि बडबड करतं. मोठं होत चाललं तसं जास्तच बिगडतायं. काय करावं याचं...!''

त्यावेळी मी निर्णय घेतला. त्याचं नाव गावातल्या बालवाडीत घातलं. त्याचं शिक्षण सुरु झालं. चुणचुणीत सोन्या हळूहळू हुशार सुशांत गावंडेत रुपांतरीत झाला. खेळ, अभ्यास, वक्तृत्त्व कलेत त्यानं नाव काढलं. माझंही त्याच्याकडे लक्ष असे. भेटल्यावर माझ्याशी भडाभडा बोलण्याची त्याची सवय मात्र अजून आहे. आज हाच सुशांत आय. पी. एस. परीक्षेत उत्तीर्ण झाला, यश कमावलं. त्याचा सत्कार होताना पाहून आनंद वाटला. त्याला साहेब बनलेलं पाहताना माझा उर अभिमानानं भरून आला. चेहऱ्यावर त्याने दाखवलेल्या बॅटरीच्या उजेडाचं समाधान आजही पुन्हा तसेच रेंगाळले.



## दिवाळी

दिवाळीची धाम-धुम अन् सगळीकडे चैतन्याचे वातावरण. दिवाळीच्या सुट्यांमुळे मुलांचा उत्साहही ओसंडून वाहत होता. कॉलनीतील सर्व मुलं उत्साहाने एकत्र येऊन किल्ला बनवत होती. किल्ल्यासाठी माती, वस्तु, प्राणी यांची जमवाजमव करण्याची लगबग चालू होती. ह्यावर्षी स्वराज्याची राजधानी रायगड तयार होणार होता. अर्धे अधिक काम होत आले होते. जणू स्वराज्याची निर्मितीच करण्याचा अविर्भाव सर्वांच्या चेहऱ्यावर होता. घरातील महिला फराळ आणि इतर कामात खूपच व्यस्त होत्या. सोहनची आई ललितााताई हिने खेळणाऱ्या आपल्या मुलाला हाक मारली, ''सोहन, अरे सोहन जरा घरी ये. दुकानातुन एवढं सामान आणून दे.''

''थांब ग आई, मला अजून खूप कामं आहेत. मला आता वेळ नाही. नंतर जातो.'' सोहन आपल्या कामात खंड पडू न देता म्हणाला. तोपर्यंत ललितााताई मुलांजवळ आल्या. तेवढ्यात गौरीची आई लिना आणि अथर्वची आई हेमा आली. सर्वजणी मुलांचा खेळ कौतुकाने न्याहाळत एकमेकींशी कामाबद्दल बोलू लागल्या. ललितााताई गौरीच्या आईला म्हणाली, ''अगं लीना, आज आठ दिवस झाले, सुमनबाई कामाला आल्या नाही. ऐन दिवाळीचा सण, खूप अडल्यासारखे होते.'' लिना तक्रारीच्या स्वरात, ''हो ना, माझ्याकडेही सुमनबाईच आहे कामाला. दिवाळीच्या कामांची गर्दी, त्यात सुमनबाई नाही म्हणजे असं झालंय, दुष्काळात तेरावा महिना. इतकं काम पडतं ना.''

ललितााताई समजावण्याच्या स्वरात म्हणाली, ''सुमनबाई तसं न सांगता दांडी मारत नाही; पण काय झालयं काही कळेना.'' अथर्वची आई, हेमा म्हणाली, ''अहो माझ्याकडे काम करणारी चंपाबाई आणि तुमची सुमनबाई जवळच राहतात. चंपाबाई

काहीतरी सांगत होती की, ''सुमनबाईच्या पाच वर्षाच्या मुलीला काहीतरी अपघात झाला आहे.''

ललिताताई घाबरुन, ''अरे बापरे! काय झालं असेल, चौकशी करायला हवी. पोरीला काही कमी-जास्त लागलं नसेल म्हणजे बरं! सणासुदीला नसती काळजी दुसरं काय?''

एव्हाना सर्व मुलांचे कानही महिलांच्या गप्पांकडे टवकारले गेले. मुलंही सर्व कामं टाकून सुमनबाईंच्या मुलीला काय झाले असेल, यावर चर्चा करु लागली. कारण बऱ्याच वेळा सुमनबाईंचा मोठा मुलगा दुर्ग आणि छोटी पुजा ह्या मुलांमध्ये खेळायला येत असत. सर्वजण सुमनबाईंच्या पूजाची काळजी करत, तिच्याविषयी बोलू लागली. दुसऱ्या दिवशी सुमनबाई आपल्या छोट्या पुजाला कडेवर घेऊन कामाला आली. मुले पूर्ण झालेल्या किल्ल्याची सजावट करण्यात गुंग होती. सुमनबाई आणि पूजाला बघताच गौरीने सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले, ''हे बघा सुमनबाई आल्या. सोबत पुजाही आहे. अरे तिच्या हाताला, तोंडाला काय झालं असेल बरे?.''

मुलं सुमनबाईभोवती गोळा झाली. ललिता, लिना हा कॉलनीतील महिलावर्गही जमा झाला. सर्वजण विचारपूस करु लागले. सुमनबाईंनी जखमी पूजाला हलकेच बेंचवर बसवले आणि डोळे पुसत सांगू लागली, ''बाईसाहेब, अहो काय सांगू, माझ्या पुजाच्या जीवावरचं संकट टळलं. आठ दिवस झाले. त्या गोष्टीला. तिची स्थिती अतिशय गंभीर होती. आज सकाळीच डॉक्टरांनी सोडलं म्हणून कामावर आले. घरातही तिच्याकडे बघायला कोणी नाही, म्हणून सोबत आणावं लागलं.''

छोटी पूजा अतिशय केविलवाण्या अवस्थेत बसली होती. तिच्या चेहऱ्यावर काळ्या भाजलेल्या फोडांच्या जखमा दिसत होत्या. कातडी सोलली गेली होती. डोळा सुजलेला दिसत होता. एका डोळ्यावर पट्टी बांधली होती. तर एका हाताला बँडेज होते. तिच्या अंगाभोवती सुमनबाईंनी शाल गुंडाळलेली होती.

पूजाला काय झालं असावं हे जाणून घेण्याची उत्सुकता प्रत्येक मुलाच्या चेहऱ्यावर दिसत होती. सगळे काळजीयुक्त चेहऱ्याने पूजाकडे बघत होते. लिना म्हणाली, ''अहो सुमनबाई, नक्की काय झालं सांगाल का? पूजाला ही अशी दुखापत कशी झाली?''

सुमनबाईंच्या डोळ्यात दुःखानं पाणी तरळलं. डोळे पुसत सुमनबाई म्हणाली, ''बाईसाहेब, काय सांगू तुम्हाला. मी क्रांतीनगरमध्ये राहते. आमच्या घराशेजारील

चौकात फटाक्यांचा कारखाना आहे. वस्तीतील सर्व मुलं दिवसभर चौकात खेळत असतात आणि आई-बाप जातात कामाला. आठ दिवसांपूर्वी गोदामात फटाक्याचा मोठा भरणा झाला. दुसऱ्या दिवशी कसं काय झालं कुणाला कळलंच नाही. दुपारी चारच्या सुमारास मुलं खेळत होती आणि अचानक फटाक्यांच्या गोदामाला आग लागली. त्यामुळे फटाके, बाँब, दारुगोळा फुटला गेला. मोठा स्फोट झाला. त्यावेळी मोठी मुलं पळाली; पण पूजा आणि दोन तीन छोटी मुलं अडकली. जखमी झाली. पोरगी खूप भाजली होती हो! हाताला लागेल की नाही अशी चिंता होती. त्यात तिचा एक डोळा गेला. खूप खर्च झाला. होतं नव्हतं ते पणाला लावलं, पण पोरगी वाचली. नशीबच म्हणायचं.''

ललितातार्इ हळहळत म्हणाल्या, ''सुमनबाई, अहो कळवायचं तरी. काही मदत करता आली असती. घाईगर्दीच्या अशा वेळप्रसंगी माणसंच माणसांच्या मदतीला येतात. तुम्ही काही काळजी करु नका. काही मदत लागली तर सांगा.''

लिना होकार भरत म्हणाली, ''मीही मदत करेल.'' सुमनबाई गहिवरुन म्हणाल्या, ''देवच पावला म्हणायचा. बाई, पण माझ्यामुळे तुमचा कामाचा लई खोळंबा झाला बघा, ह्या सणासुदीच्या दिवसात.''

''ललितातार्इ, सुमनबाई, अहो कामं काय होतंच राहतील. आधी पोरीकडे लक्ष द्या. ती बरी झाली म्हणजे भरुन पावलं बघा.''

''सुमनबाई, बघा ना बाईसाहेब, ह्या फटाक्यांनी माझ्या पोरीचं रुप कसं विद्रुप करुन टाकलयं. त्यात एक डोळा गेला तो कायमचा. कसं व्हायचं तिचं. सरकारी डॉक्टर म्हणाले, ''जखम बरी झाल्यावर डोळ्याचं ऑपरेशन करता येईल. ऑपरेशनला खूप खर्च येणार आहे.''

''ललितातार्इ, सुमनबाई जी काय मदत लागेल, ती करु. तुम्ही काही काळजी करु नका. पोरीला दिसलं पाहिजे म्हणजे झालं.''

सर्व मुले हे बोलणं गंभीरपणे ऐकत होती. सोहन हिरीरिने पुढे येत म्हणाला, ''आई ह्या दिवाळीला मला नवीन कपडे आणि फटाके घेऊ नको. त्याचे सर्व पैसे तू पूजाच्या ऑपरेशनला दे.'' सोहनचा समजूतदारपणा बघून ललितातार्इंच्या डोळ्यात समाधान तरळले. सोहनपाठोपाठ गौरी, अथर्व, अनघा सर्व मुलांनीही नवे कपडे आणि फटाके न घेता पैसे पूजाच्या ऑपरेशनसाठी देण्यात पुढाकार घेतला. हे बघून त्यांच्या मातांनाही समाधान वाटले. मुलांची मदतीची भावना बघून सुमनबाईंना गहिवरुन आले.

सोहन म्हणाला, ''आई फटाके फोडणं खरंच किती घातक असते. त्यामुळे जखमा तर होतातच; पण मी असं ऐकले की कधी-कधी एखाद्याचा मृत्यूही होऊ शकतो.''

गौरी म्हणाली, ''हो या धोक्याबरोबरच फटाके फोडल्यामुळे हवेचे प्रदूषण होते ते वेगळेच. फटाक्यांमुळे कितीतरी घातक वायू हवेत पसरतात. यामुळे दम्याच्या आणि श्वासाचा त्रास असणाऱ्यांना त्रास होतो. खरंच, यावेळी आपण आपल्या कॉलनीत फटाक्यांवर बंदीच घालू.'' अथर्व तिला दुजोरा देत म्हणाला, ''गौरी अगदी बरोबर आहे तुझं. अगं फटाक्यांच्या भयंकर कानठळ्या बसणाऱ्या आवाजाने ध्वनी प्रदूषण होते, ते वेगळेच. कानठळ्या बसवणाऱ्या या आवाजामुळे लहान मुलं, आजारी माणसं आणि वृद्धांनाही खूप त्रास होतो. झाडावर निवाऱ्याला बसलेले पक्षीही या आवाजाने घाबरुन जातात. त्यापेक्षा फटाके न फोडलेले बरे.''

मुलांच्या या बोलण्यावर खुश होत लिनाताई म्हणाल्या, ''मुलांनो तुम्ही तर अगदी समजदारीने बोलता आहात. खरंच फटाके हे सर्वच दृष्टीने हानिकारक आहेत. ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण पूजाच्या रुपाने तुमच्या समोर आहे.''

''ललितताई, हो तर, नाहीतर दिवाळी आल्यावर फटाक्यांसाठी मुलांचा हट्ट म्हणजे कहरच असतो.''

सोहन म्हणाला, ''आई आम्हा मुलांना सर्व समजतं; पण फटाक्यांची गंमत वेगळीच म्हणून आम्ही हट्ट करतो. पण, आता पूजाच्या रुपाने फटाक्यांचे दुष्परिणाम जिवंत समोर आल्यामुळे ते प्रकर्षाने जाणवले.''

सुमनबाई म्हणाल्या, ''मुलांनो खरंच तुम्ही समजदार, हुशार आहात. फटाके म्हणजे वाईटच.''

ललितताई म्हणाल्या, ''खरंच सुमनबाई, ह्या दिवाळीत संपूर्णपणे फटाके वर्ज्य. तुमच्या पुजाच्या डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी लागणारा सर्व खर्च आमची कॉलनी करेल. तीला तिच्या डोळ्यांनी जेव्हा नवा प्रकाश बघता येईल, तेव्हा तीच आम्हा सर्वांसाठी खरी दिवाळी असेल.''

मुलांनीही आनंदाने माना डोलावून सहमती दिली. मुले हुर्रे-हुर्रे करत पूजाभोवती फेर धरून नाचू लागली. मुलांच्या ह्या आनंदाने पूजाच्या दुखऱ्या चेहऱ्यावर हसू फुलले.

☯☯☯



## सहलीतून नवा विचार

शाळेला दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या. रोहित आणि कपिलच्या फॅमिलीने या वर्षी नाशिक या तिर्थक्षेत्री येण्याचे नक्की केले. रोहित आणि कपिल एका वर्गात, एका बेंचवर बसणारे इयत्ता आठवीतील विद्यार्थी. खरंतर त्या दोघांनी नाशिक, पंचवटी, काळाराम मंदिर, गोदावरी याविषयी खूप ऐकले होते. त्यांना नाशिक बघायची ईच्छा होती आणि ते प्रत्यक्षात कुटुंबियांसमवेत नाशिकला आलेही. रोहित गोखले आणि कपिल देशमुख या दोघांच्या मैत्रीमुळे त्यांच्या आई- बाबांचीही घट्ट मैत्री झाली होती.

काळ्या पाषाणातील भव्य काळाराम मंदिर मुलांना आवडले. भव्य सभामंडप, त्यातील कोरीव काम बारकाईने न्याहाळात त्यावर मुलांची चर्चा झाली. सर्वजण पंचवटीतील सीता गुंफा, पंचवटी बघत नदीकाठाने फिरत होते. रोहित बाबांना म्हणाला, ''बाबा, ह्या नदीकाठच्या झाडांमध्ये बघा ना किती प्लॅस्टीक पिशव्या, कचरा अडकला आहे. हे असं कशामुळे?''

रोहितचे बाबा सांगू लागले, ''अरे दोन महिन्यांपूर्वी गोदावरी नदीला मोठा पूर आला होता. न्यूजपेपरमध्ये आपण वाचलेच होते. त्यावेळी नदीचे पाणी पात्र सोडून शहरात, तसेच गावा-गावांमध्ये शिरले होते. त्यावेळी नदीपात्रात माणसांनी टाकलेला कचरा अशा प्रकारे बाहेर पडला आणि नदिकाठची झाडं, शेती आणि जमिनीवर तो असा इतस्तः विखुरला गेला आहे.'' रामकुंडावरुन सर्वजण काळाराम मंदिराकडे चालत निघाले होते. हे ऐकून कपिल म्हणाला, ''बापरे, किती भयंकर! काका आपल्याला कल्पनाही नाही. माणसं इतका कचरा नदीपात्रात टाकतात. माणसांनी हे सगळे थांबवले पाहिजे.''

कपिलचे बाबा म्हणाले, ''खरचं नदीपात्रात प्लॅस्टीक कचरा टाकल्यामुळे खूप समस्या निर्माण होतात. त्याकडे दुर्लक्ष केले जातेय. प्लॅस्टीकमुळे जल वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. भूगर्भात पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होतो. परिणामी, भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होत चाललीय.''

रोहित म्हणाला, ''काका मी वाचलंय, ह्या प्लॅस्टीकच्या पिशव्यांचे बारीक बारीक कण होतात आणि ते कण मासे व इतर जलचरांच्या पोटात जाऊन ते मरत आहेत.''

कपिलचे बाबा म्हणाले, ''बरोबर आहे तुझं रोहित. या सर्व गोष्टीचा बारकाईने विचार केला पाहिजे.'' आजुबाजुला दिसणाऱ्या प्लास्टीक कचऱ्यामुळे सगळ्यांना चिंता वाटली. रोहित आणि कपिल दोघांच्या आईंनीही मान हलवून ह्या गोष्टीस दुजोरा दिला. प्रथम सर्वजण रामकुंडावर आले. गोदाकाठावरील उंच मंदिरे, घाट बघून मुलं खुश झाली. जगजननी गोदावरीला सर्वांनी नमस्कार केला. नदीपात्रात पाण्याचा बारीक प्रवाह होता. रोहित आणि कपिलची आई रामकुंडातील पाण्याने हातपाय धुवून, आचमन करु लागल्या, तेव्हा त्यांना थांबवत रोहितचे बाबा गोखले म्हणाले, ''थांबा! थांबा! पाणी पिऊ नका. बघा तरी हे पाणी स्वच्छ आहे का?''

कपिलची आई म्हणाली, ''खरंच, पाणी अगदी गढूळ आहे. नदीपात्रातील पाणीही कमी झालेले दिसते आहे आणि भाविकांची गर्दी तरी किती अवाढव्य आहे. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण झालेले दिसते.''

रोहितची आई म्हणाली, ''अगं, त्या घाटावर बघ. काही गवळी लोकं आपली जनावरेही नदीपात्रात धुवत आहेत. बायका धुणं, भांडी करीत आहेत. यामुळे पाणी प्रदूषीत, खराब होणारच. रोहितने नाकावर रुमाल धरला व म्हणाला, ''हे बघा किती पानं, फुलं, कचरा नदीपात्रात टाकलाय. त्यामुळे ते सडून त्याचा दुर्गंध येतोय. पवित्र तिर्थक्षेत्र म्हणून लोक दूरदूरुन दर्शनाला येतात आणि येणारे लोकच निर्माल्य, कचरा टाकून घाण करतात. स्वच्छता न ठेवल्यामुळे ही स्थिती दिसत आहे.''

रोहितचे बाबा म्हणाले, ''खरं आहे तुमचं, परंतू आलेले पर्यटकही अस्वच्छता करतात. प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून वागले पाहिजे. स्वच्छता राखली पाहिजे.''

कपिल उत्सुकतेने म्हणाला, ''आपले पुर्वजही नदीकिनारी घाटांवर राहणारे होते. त्यावेळी प्रदूषण होतच असेल.'' कपिलचे बाबा उत्तरले, मुलांनो, जुने लोक

नदीला माता मानून तिची पूजा करायचे. तिला दुषित करायचे नाही. शिवाय त्यावेळी कारखाने नव्हते. आज कारखान्यातून बाहेर पडणारे विषारी पाणी तसेच, अस्वच्छ पाण्याचे नाले नदीत सोडले जातात. त्यामुळे प्रदुषणाचा प्रश्न इतका बिकट झाला आहे.''

रोहित पोटतिडकीने म्हणाला, ''हे अगदी खरचं आहे. कारखान्यातील रासायनिक पदार्थांनी युक्त पाणी म्हणजे तेजाबच म्हणावे लागेल. नदीपात्रात हे अशुद्ध विषमिश्रीत पाणी सोडल्याने पाण्यातील जलजीव आणि जल वनस्पती यांच्या जिविताला धोका पोहचत आहे.'' आपल्या मुलांना प्रदूषणाची पूर्ण कल्पना आली, हे बघून दोघांच्याही आईंच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. तेव्हा कपिलचे बाबा म्हणाले, ''याबरोबरच नदीकाठच्या शेतांवर, द्राक्षबागांवर किटक नाशकांची फवारणी केली जाते. पाऊस पडल्यावर किटकनाशकयुक्त पाणी नदीपात्रात येते. त्यामुळे जलजीवांच्या जिविताला धोका निर्माण होतो.''

रोहितचे बाबाही त्यांना दुजोरा देत म्हणाले, ''हे तर आहेच, याबरोबरच माणूससुद्धा असे पाणी पिऊन दगावु शकतो.''

कपिलची आई म्हणाली, ''म्हणजे जी जगसंजीवनी सर्वांना पाण्याच्या रुपाने जीवन देते, त्याच गोदावरी नदीचे पाणी मानवाने इतके प्रदूषित केले आहे की ते प्यायलाही भीती वाटते!''

कपिलचे बाबा म्हणाले, ''प्रदूषित पाणी प्यायल्यामुळे अनेक रोगांना आमंत्रण मिळते. प्रदूषित पाण्यामुळे त्वचारोग आणि डोळ्याचे विकारही उद्भवतात. असे रोगसदृश्य संक्रमित पाणी पिल्यामुळे मृत्यूही होऊ शकतो.''

अशी स्थिती एकाच नदीची नाही, तर देशभरातल्या सर्वच नद्यांची आहे'' रोहितची आई.

कपिलच्या आईनेही होकार दिला, ''हो, गंगा, यमुना ह्या नद्यांचे प्रदूषणही वाढले आहे. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी कितीतरी उपक्रम सरकारने, लोकांनी हाती घेतले आहेत. परंतू, प्रत्यक्षात परिणाम दिसायला वेळ लागेल.''

त्यावर रोहितची आई मुलांना उद्देशून म्हणाली, ''मुलांनो, तुम्हाला तर माहित आहेच, यमुना नदीच्या डोहात कृष्णाने विषारी कालिया नागाचे मर्दन केले होते.''

कपिलचे वडिल हसत म्हणाले, ''त्यावेळी कालिया नागाने पाणी विषारी केले होते. परंतु, आज गोदावरी आणि अशा अनेक नद्यांचे पाणी विषारी करणारे अनेक साधनं आहेत. त्यांना आपण कालिया नागाचे अनेक फणच म्हणू शकतो.'' मुलांच्या ही

गोष्ट लवकर लक्षात आली नाही. परंतू, लक्षात आल्यावर ती दोघेही खळखळून हसू लागले.

रोहितची आई म्हणाली, ''अनेक कारणांमुळे नदी प्रदूषण वाढले आहे. ते कमी करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने जबाबदारीने पुढे येऊन कार्य केले पाहिजे. नदी प्रदूषित न होण्यासाठी सर्वांनी कंबर कसून कामाला लागले पाहिजे.''

रोहित म्हणाला, ''खरंच प्रदुषणाचे भयंकर परिणाम आहेत. आई, आम्ही मुलं आता यासाठी सर्व देशवासियांना जागरुक करु. इंटरनेटवरुन यमुना, गंगा सफाईची, त्यासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती घेऊ. त्याचे पोस्टर्स बनवू. सर्व वर्गमित्रांमध्ये त्यावर चर्चा करुन जागरुकता निर्माण करु.''

कपिलचे बाबा, ''बरोबर मुलांनो! यासाठी तुम्ही मुलांनीच पुढाकार घेतला पाहिजे. यमुना ऍक्शन प्लॅन २, गंगा बचाव अभियान यानुसार जनजागृतीसाठी तुम्ही प्रयत्न करु शकता.''

रोहितचे बाबाही मुलांना प्रोत्साहन देत म्हणाले, ''खरं आहे मुलांनो, तुम्ही उद्याची भावी पिढी. तुम्ही संकल्पशक्तीद्वारे सफलतेचा मंत्र घेऊन नक्कीच यशस्वी व्हाल.''

कपिल म्हणाला, ''घरी गेल्यावर मोकळ्या वेळात आम्ही गोदावरी, गंगा, यमुना तसेच इतर नद्या, तळे यांचा प्रदूषणापासून बचाव करण्यासाठी जागरुकता निर्माण करु. आम्ही स्वतः कधीही पाणी प्रदूषण करणार नाही. दुसऱ्यांनाही करु देणार नाही. नदी सफाई अभियानासाठी पोस्टर्स बनवू. नदीला वाचवू, स्वतःला वाचवू' अशा घोषणा देऊन आम्ही सर्व मित्र हा संदेश लोकांपर्यंत पोहचवू.''

कपिल आणि रोहित यांच्या चेहऱ्यावर कार्य करण्याचा निर्धार स्पष्ट दिसत होता आणि हा त्यांचा निर्धार, नवीन कार्य करण्याची उमेद बघून त्यांच्या आई-वडिलांच्या डोळ्यात समाधान तरळले. नव्या पिढीच्या संकल्पशक्तीचे प्रतिनिधीत्व करण्याच्या मुलांच्या निर्धाराकडे दोघांचेही आई-बाबा गर्वाने पाहात राहिले. नाशिकला येण्याने मुलांना नवी दिशा, नवा विचार मिळाला. आपली ट्रिप यशस्वी झाल्याने सर्वांना समाधान वाटले.

☯☯☯



## आजीची भाजी भाकरी

''किटू चल उठ! तुला आस्थाच्या घरी जायचं आहे ना.'' असं आईने म्हणताच किटु टुणकन उठून बसली, हो तर काल आम्ही चिन्मयकडे गेलो होतो. आज आस्थाकडे जाणार खूप धमाल करणार. तिची आजी आज आमच्यासोबत असणार.''

''अरे वा ! मग काय मज्जाच ! तू तुझं आवर आधी. डबा काय देऊ आज?'' आईने किटूच्या केसांवरुन प्रेमाने हात फिरवत विचारले.

किटू लाडात येऊन म्हणाली, ''मॉम, मला आज मॅगी आणि क्रिम बिस्किटं दे.''

आई म्हणाली, ''अगं किटु छान मिक्स व्हेज, पुऱ्या केल्याय ते देते. आवडेल तुला.''

किटूने हट्टच धरला, ''अं हं, मी म्हणाले तेच पाहिजे.''

''आई, बरं बाई, चला आवरुन निघा आता. सगळे वाट बघत असतील.''

किटू आस्थाकडे पोहचली तेव्हा सगळीजण तिचीच वाट बघत होते. नंतर आस्थाच्या आजीने मुलांचे वेगवेगळे खेळ घेतले. छान छान जुन्या- नव्या गोष्टी सांगितल्या. दुपारी जेवणाच्या वेळी सर्वजण आपापले डबे उघडून, गोल रिंगण करुन जेवायला बसले. आजी सर्वांना स्वतः बनवलेली गरम गरम भाकरी आणि मेथीची भाजी वाढत होती. त्याबरोबर गुळ पोळीचा लाडू, भाकरी आणि भाजी बघून तर सर्व मुलं

नाक मुरडायला लागली. कारण सर्वांनी आपापल्या डब्यात मॅगी, सॅन्डवीच, पिझ्झा, क्रिम बिस्कीटं, रोल असे आवडते जीन्नस आणलेले होते. आजी सर्वांना म्हणाली, ‘‘चला आता वदनी कवल घेता, नाम घ्या श्रीहरीचे’ ही प्रार्थना डोळे मिटून म्हणा आणि आनंदाने जेवणाला सुरुवात करा.’’

सर्वजण आपल्या डब्यातील पदार्थ आनंदाने एकमेकांना देऊ लागले. आस्था आग्रहाने म्हणाली, ‘‘आजीने वाढलेली मेथीची भाजी-भाकरी, लाडूही खा सर्वांनी.’’

आजी प्रेमाने म्हणाली, ‘‘हो तर, बघा अमृताची चव आहे याला. परत भाकरी आणि हिरव्या भाजीतून इतकी एनर्जी मिळेल, की दिवस मावळला तरी खेळून तुम्ही दमणार नाही. करा सुरुवात. पानात काहीच उरु द्यायचे नाही.’’

आजीच्या आग्रहामुळे मुलांनी नाईलाजाने भाजी-भाकरी खाण्यास सुरुवात केली. पहिलाच घास इतका गोड लागला, की मुलांनी आजीने वाढलेली भाजी, भाकरी, लाडू मिटक्या मारत संपवली. बिचारे पिझ्झा, बर्गर, क्रिम बिस्किट, मॅगी केविलवाणेपणे बघत बसले होते.

☯☯☯



## काकांचा दरारा, बागेला तजेला

स्नेहाचे रत्नागिरीचे काका-काकू, बरोबरचे चुलत बहिण- भावंडं सुटीमध्ये आली होती. स्नेहाची आई काकांना म्हणाली, ''भाऊजी, आज स्नेहाचं कॉलनीतलं मित्रमंडळ आपल्याकडे येणार आहे. मला तर ऑफिसमध्ये आज महत्वाची मिटींग आहे. तुम्ही आज मुलांना वेळ द्याल?''

काका आनंदाने म्हणाले, ''अरे व्वा! वहिनी तुम्ही तर माझ्या आवडीचं काम सांगितलं. बच्चे कंपनीत खेळायला, मस्ती करायला मला आवडतं. त्यामुळे परत एकदा आपण बालपण अनुभवतो. हो की नाही.''

''खरंच हो ! मीही आज तुमच्या बच्चे कंपनीची मेंबर आहे, बरं का'' काकू उत्स्फूर्तपणे म्हणाली. हा संवाद ऐकून स्नेहा आणि तिची भावंडं उत्साहाने मित्रमंडळाच्या स्वागताला तयार झाली. हळूहळू दहा-बारा सोबती जमा झाले. काकांनी सर्वांची ओळख परेड घेतली. किटू, आस्था, प्रेरक तर काकांच्या उंचपुऱ्या धिप्पाड देहयष्टीने, करड्या आवाजाने जाम टरकले. पण, हळूहळू काकांनी गंमतीचा, विनोदाचा पेटारा उघडला तशी मुलांची भिती पळून गेली. सर्वांनी काका, काका म्हणत त्यांच्याभोवती दिवसभर पिंगा घातला. गप्पा, गोष्टी, खेळ, विनोद, गाणी, नाटुकली याबरोबरच काकूच्या खाद्यपदार्थांनी आजच्या दिवसाला रंगत आणली.

दुपारचे चार वाजले. मुलांचा उत्साह काही कमी झाला नव्हता. काका ऑर्डरच्या सुरात म्हणाले, ''अब चलो गार्डन में.'' मुलं काकांच्या मागे बंगल्याभोवतीच्या बागेत आली. काकांनी मुलांना बागेतील विविध झाडं, फुलं, पानं, फळांची ओळख

करुन दिली. औषधी वनस्पती मुलांना दाखवल्या. त्याचे उपयोग सांगितले. काकांनी अधिक माहिती पुरवली. काका म्हणाले, ''आता पावसाळा सुरु होईल, तेव्हा आपण सर्वजण आज सर्व झाडांच्या बुंध्याभोवती आळं तयार करु. त्यांना खत देऊ आणि पाणी घालूया. वाळलेली पाने, गवत काढून बाग स्वच्छ करुया.''

प्रेरक आनंदाने पुढे होत म्हणाला, ''हो तर, झाडं आपल्याला कितीतरी गोष्टी देतात. त्यांची आपण प्रेमाने निगा राखूया.'' सर्व मुलं आनंदाने बागेत काम करू लागली. हिरीरीने, आवडीने माती, पाणी, चिखल यांच्या रंगात मुले रंगून गेली. या नजाऱ्याकडे बघून काका-काकू हरखून गेले.

☯☯☯



## राखीचे बंधन

महाराणी कर्णावती, महाराज संग्रामसिंह, जवाहरी बाई आणि मंत्री यांची चितौडच्या राजदरबारात राजकारणावर चर्चा रंगली होती. त्याचवेळी दरबारात दूत खलिता घेऊन आला. महाराजांना त्रिवार मुजरा करुन त्याने खलिता मंत्र्यांच्या हाती सोपवला. महाराज संग्रामसिंह आपल्या बुलंद आवाजात म्हणाले, ''वाघसिंह खलित्यात काय लिहिले आहे?'' वाघसिंह, महाराज, पूर्व मावळ्यातील सरदार सिलहद्दी यांनी आपली मदत मागितली आहे. त्यांना काही शस्त्रास्त्रांचा पुरवठा हवा आहे. तसेच, सैन्य प्रशिक्षणासाठी आपल्या राज्यातील खास प्रशिक्षकांची त्यांनी विनंतीपूर्वक मागणी केली आहे.'' महाराज विचारपूर्वक म्हणाले, ''काही हरकत नाही. सिलहद्दी आपले शेजारी आहेत. त्यांना आवश्यक ती मदत पुरवली जावी.'' त्यावर मंत्री चिंतेने म्हणाले, ''परंतु महाराज, सिलहद्दी आणि बहादूर शहा यांचे वैर लक्षात घेता, तसे करणे योग्य नाही. उगीचच बहादूरशहाशी वाकडे घेण्यात अर्थ नाही.'' महाराज संग्रामसिंह समजावत म्हणाले, ''बहादूरशहाशी वाकडं येण्याचा प्रश्नच नाही. मदतीची याचना करणाऱ्याला मदत करणं राजपूतांचा धर्म आहे. सरदार सिलहद्दीला सर्वतोपरी सहाय्य केलं जावं....''

काही दिवसांनी चितौडवर बहादूरशहाने आपल्या सैन्यानिशी चढाई केली. ही बातमी कळताच महाराज संग्रामसिंह सेनापतींना युद्धासाठी सज्जतेची आज्ञा दिली. सेनापती म्हणाले, ''महाराज आत्तापर्यंत तर बहादूरशहा आपल्याशी मैत्रीचे संबंध

दाखवत होता आणि आता आपण सिहलदीला मदत केल्याचे निमित्त घेऊन आपल्यावर चढाई करतो, म्हणजे काय?''

महाराज : यामध्ये बहादूरशहाचा वेगळाच डाव आहे. हुमायुनला डिवचून युद्धास प्रवृत्त करण्यासाठी बहादूरशहाची ही खेळी आहे. जर बहादूरशहाला पूर्व राजस्थानचा ताबा घेता आला, तर तेथून आग्रा आणि दिल्ली येथील मुघल सत्तेला शह देणे सोपे होईल. म्हणूनच मुघल सत्तेला धोका निर्माण करण्यासाठीच त्याने चितौडवर स्वारी केली आहे. चला युद्धाला सज्ज झाले पाहिजे.''

सेनापती तावाने म्हणाले, ''हुमायुनला शह देण्यासाठी बहादूरशहा आपल्याला धक्का लावतोय. चित्तौडवर हल्ला करणं बहादूरशहाला खेळ वाटतोय का? राजपूतांना जिंकणं केवळ अशक्य, हे बहादूरशहाने ओळखून असावे...''

तेवढ्यात राणी कर्णावती म्हणाली, ''ऐकलं ते खरं का? बहादूरशहा चित्तौडवर चालून येतोय?''

'' महाराज, हो, युद्धाच्या सज्जतेची तयारी चालू आहे. आम्हाला निघायला हवं स्वारीवर. तुम्हीही सजग राहा. जीवात जीव असेपर्यंत चित्तौड जिंकणं शत्रूचं स्वप्नच राहिल.''

वाघसिंह म्हणाले, ''महाराज, आम्ही ऐकलं आहे की, बहादूरशहाच्या फौजेत अद्ययावत तोफखाना आहे. मुस्तफा आणि ख्वाजा सफर हे दोघे तोफखाना तज्ज्ञ त्यांच्या सैन्यात आहेत. त्यांनी त्यांच्या सैन्याला ते युद्धतंत्र शिकवून दिले आहे. त्यांच्या या नवीन तोफांपुढे आपला टिकाव किती लागेल?'' महाराज त्यांना थांबवत म्हणाले, ''मंत्री महोदय, खूप बोलतात. तुमचे विचार ठिक आहेत, राजपूतांच्या वीरांची शौर्यगाथा संपूर्ण भारत वर्षात निनादत आहे.''

राणी कर्मावती यांनी महाराज संग्रामसिंहाचे औक्षण केले, ''विजयश्री घेऊन या! आपलं धैर्य, शूरता प्रकाशमान होऊन चितौडचे रक्षण होवो.'' संग्रामसिंह उत्साहाने म्हणाले, ''महाराणी आपल्याला विजयश्री नक्कीच प्राप्त होईल. माझ्या पाठीमागे चित्तोडचा कारभार व्यवस्थित पाहा. काही कमी जास्त झाले, तर चित्तोडच्या इभ्रतीचं रक्षण करा. तसं आपल्यासारख्या शूरवीर राजपूतांना काही वेगळं सांगण्याची गरज नाही.''

महाराज संग्रामसिंह आणि शेरशहा यांच्यात तुल्यबळ युद्ध झाले. या युद्धात महाराज संग्रामसिंहांना वीरगती प्राप्त झाली. तरी, राजपूत प्राणपणाने लढा देत आहेत. एक दिवस वाघसिंह यांनी धावत- पळत येऊन महाराणी कर्मावतीला समाचार दिला, महाराणी, बातमी वाईट आहे. आपला पाडाव होत आहे. तरी आपल्या सैन्याने चिकाटी सोडलेली नाही. आपल्याला कुणाची तरी मदत घ्यावी लागेल.''

कर्मावती धीराने म्हणाली, ''बातमी वाईट आहे; पण युद्धभूमीवरचं प्रत्यक्ष चित्र काय म्हणते?''

वाघसिंह, राजपूत विरतापूर्वक लढत आहेत. आपली सैन्यसंख्या कमी आहे. दुसऱ्या बाजूचा तोफखाना आग ओकत आहे. त्याचा मुकाबला तलवारीने करता येणार नाही. आपल्याला मरणं भाग आहे. पण, मातृभूमीच्या रक्षणार्थ आम्ही स्वतः हसत-हसत मरु. शिवाय शत्रूला मारुन.''

कर्मावती सुस्कारा सोडत म्हणाल्या, ''खूप कठिण प्रसंग आहे हा! महाराजांच्या विरगतीनंतरही चित्तौडची सेना प्राणपणाने शत्रूचा विरोध करीत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. आपल्याला कुणाची तरी मदत घ्यावी लागेल.'' तेव्हा जवाहरीबाईने लक्षात आणून दिले, आपल्याला बाहेरच्या आक्रमणापेक्षा अंतर्गत कलहाचाच जास्त त्रास होतोय. या अंतर्गत कलहाचाच फटका महाराजांना बसला. जवळच्यांकडून कुठली मदत मिळेल ही गोष्ट दुरापास्त वाटतेय''

कर्मावती मान डोलावत म्हणाल्या, ''जवाहरी, बरोबर बोललीस तू. हे आम्हीही ओळखून आहोत. मेवाडकडे नजर वर करुन पाहण्याची कुणाची हिम्मत होती? महाराजांच्या शौर्यामुळे बाहेर दूर दूरपर्यंत अत्याचारी लोक भितीनं कापत असत. मग मेवाडच्या सिमेवर पाय ठेवण्याची कुणाची हिंमत होती? वाघसिंहजी आपण आपल्या आपसातील शत्रूता, कलहामुळे स्वतःच्या हातांनी स्वतःचे नुकसान करून घेतले आहे.'' त्यांना होकार देत वाघसिंह म्हणाले, ''ते खरं राणीसाहेब, पण आता पश्चाताप करुन काही फायदा नाही. शत्रूने आपल्याला अगदी जेरीस आणले आहे. यातून बाहेर पडण्यासाठी काहीतरी मार्ग सांगा.''

कर्मावती विचार करत म्हणाल्या, ''मला एक उपाय सुचतोय, मी मुघलांचा राजा हुमायूनला राखी पाठवते. भाऊ म्हणून बहिणीच्या या संकटसमयी तो नक्कीच धावून येईल मदतीला.''

यावर जवाहरी आश्चर्यचकीत होत म्हणाली, ''काय हुमायूनला? एका मुसलमानास राखी पाठवून भाऊ बनवता?''

कर्मावती तिला समजावत म्हणाली, ''चकीत का होते जवाहरी तू? मुसलमानसुद्धा माणसंच असतात. त्यांनासुद्धा बहिणी असतात. विचार कर, ती काय माणसं नाही? त्यांच्या शरीरात हृदय नसते का? ते फक्त ईश्वराला खुदा' म्हणतात. ''मंदिरात न जाता मस्जिदमध्ये जातात. म्हणून काय ती वेगळी झाली? वाघसिंह यावर आपले विचार काय आहे?''

'' महाराणी, ही गोष्ट इतकी सोपी नाही. हुमायून इतक्या लवकर जुने वैर विसरु शकेल? फत्तेपूर शिकरीच्या युद्धाच्या जखमेचं निशाण इतक्या सहजतेने मिटेल? याउपर आपला हुकूम मान्य होईल'' वाघसिंहांनी आपले विचार व्यक्त केले.

त्यावर कर्मावती भावनिक होऊन दुरदृष्टीने म्हणाल्या, ''माझ्या बंधूप्रेमाच्या भावना त्यांना नक्कीच समजतील. या बहिणीच्या मदतीला ते नक्कीच धावतील असा माझा विश्वास आहे. आमची राखी असं प्रभावी औषध आहे, की त्यामुळे सारे जुने घाव भरुन निघतील. कितीही मोठं वैर असो, ते संपवण्याची ताकद राखीत आहे.''

जवाहरी चाचरतच म्हणाली, ''पण, ते आपले शत्रू आहे...'' तिला मध्येच थांबवत महाराणी कर्मावती म्हणाल्या, ''असं म्हणू नकोस जवाहरी. आपल्या प्रमाणेच भारत ही त्यांची जन्मभूमी झाली आहे. आता त्यांचा जथा बनवून त्यांना आपण अरबस्थानात पाठवू शकत नाही. त्यांना इथंच राहायला लागेल आणि आपल्याला त्यांना ठेवून घ्यावंच लागेल. त्यांनी आम्हाला आपली बहिण मानावं आणि आम्ही त्यांना भाऊ मानावं, हेच उचित आहे.''

जवाहरीला ते पटलं. ती म्हणाली, ''भाऊ- बहिणीचे नातं खरं तर दैवी देणगी आहे.''

ते ऐकून कर्मावतीचा उत्साह दुनावला. त्या म्हणाल्या, ''म्हणूनच ह्या कठिण प्रसंगी मेवाडच्या रक्षणासाठी याहून दुसरा चांगला विचार असू शकणार नाही. वाघसिंहजी आपण काही सांगा. यावर आपला काय सल्ला आहे?''

वाघसिंह मान तुकवत म्हणाले, ''महाराणी, आम्ही फक्त आपल्या आज्ञेचे पालन करणं जाणतो. सल्ला देणं नाही. आपण म्हणता त्याप्रमाणे होईल.''

कर्मावतींनी फर्मान सोडले, तर मग ठिक आहे. बंधुत्व आणि मनुष्यता यावर विश्वास ठेवून हुमायुनची परीक्षा घेऊया. हे घ्या हे सोन्याचं कंकण, राखी म्हणून पाठवा. त्यासोबत आमचं हे पत्र द्या. दुताकरवी आजच पाठवण्याची व्यवस्था करा. आम्हाला विश्वास आहे, हे राखीचं बंधन सर्व जाती-धर्माचं बंधन तोडून आमच्या एका बहिणीच्या संरक्षणार्थ नक्कीच धावेल.''

त्यावर जवाहरी म्हणाली, ''मग तर खूपच छान! आम्हीही बघतो कोण किती पाण्यात आहे. यावरुन परीक्षा करता येईल की मनुष्यता धर्मात किती ताकद आहे''

कर्मावतींना मुजरा करुन वाघसिंहांनी आज्ञा घेतली, महाराणी, येतो आम्ही. सर्व आपल्या आज्ञेप्रमाणे करतो. आपले विचार नक्कीच यथार्थ ठरतील.''

दूत जलद गतीने मुघलांच्या छावणीकडे रवाना झाला. गंगा किनाऱ्यावर फौजी छावणीमधील खास तंबुत बादशहा हुमायून आपला मंत्रीततारखान ह्याच्यासोबत बसला असतानाच सैनिकाबरोबर दूताने प्रवेश केला. दूताने बादशहा हुमायूनला अभिवादन केले. हुमायूननेही उत्साहानं मेवाडच्या दूताचे स्वागत केले, यावं, यावं मेवाडच्या बहादूरा!''

दुताने पुन्हा अभिवादन करुन खलिता हुमायूनपुढे सादर केला, ''स्वर्गिय महाराणा संग्रामसिंहजींची पत्नी कर्मावती यांनी आपल्याला ही भेट पाठवली आहे.''

हुमायून आनंदाने ती मखमली पेटी हातात घेऊन उद्गारला, ''व्वा, व्वा! आमचं भाग्य! हिंदूबेग आपण जाणताच आम्ही मेवाडची खूप इज्जत करतो. प्रत्येक बहादूर व्यक्तीनं केली पाहिजे. चितौडची भूमी शूरविरांची आहे. प्रत्येक शूरानं कपाळाला लावावी, अशी ती पवित्र माती आहे.'' बादशहाने पत्र वाचले.

ततारखान आश्चर्यानं म्हणाला, ''बादशहा... शत्रूची इतकी तारीफ? काय लिहिलंय पत्रात जहापनाह? महाराणी कर्मावतीनं जादूचा पेटारा पाठवला आहे काय?

हुमायून आनंदाने उद्गारला, ''होय ततारखान, खरंच त्यांनी जादूचा पेटाराच भेट म्हणून पाठवला आहे. माझ्या सुन्या-सुन्या आकाशात त्यांनी भगिनी प्रेमाचा चंद्र चमकावला आहे. महाराणी कर्मावतींनी आम्हाला भाऊ मानून राखी पाठवली आहे.''

ततारखान त्यावर आश्चर्याने उद्गारला, ''क्या? क्या कहते हो जहांपनाह...''

हमुयून म्हणाला, ''खरंच, त्यांनी आम्हाला भाऊ मानून आमच्यावर विश्वास टाकला आहे. मेवाडच्या शूर दूता कर्मावती देवींना सांगा हुमायूननं आपल्या मातेच्या

कुशीतून जन्म घेतला नाही म्हणून काय झालं? हा भाऊ सख्ख्या भावापेक्षा कर्तव्यात पुढे राहील. सांगा मेवाडची इज्जत ही आमची इज्जत आहे... या आपण... आम्ही लगेचच त्यांच्या मदतीसाठी कूच करतो...''

ततारखानने शंका उपस्थित केली, ''बादशहा, आपण आपल्या आब्बाजानच्या जानीदुश्मन संग्रामसिंहच्या पत्नीच्या मदतीसाठी कसे तयार झालात? ज्याने शपथ घेतली होती की, हिंदुस्थानातून मुघलांना बाहेर काढल्याशिवाय चितौडमध्ये पाऊल ठेवणार नाही आणि राखी पाठवल्यानंतर आपण लगेच त्यांच्या मदतीसाठी तयार झालात. त्यांची प्रार्थना मंजूर केली.''

हुमायून म्हणाला, ''ततारखान, ही प्रार्थना नाही. तो एका बहिणीचा आपल्या भावाला हुकूम आहे. मला खेद वाटतो राखीची किंमत तुम्हाला कळाली नाही. राखीचे हे रेशमी नाजूक धागे शत्रुलाही प्रेमाच्या साखळीने बांधून ठेवण्याचे काम करतात. माझे अहोभाग्य आहे की, मेवाडच्या बहादूर राणीने मला भाऊ मानले आणि बहादूरशहापासून मेवाडच्या रक्षणासाठी माझ्या मदतीची अपेक्षा केली आहे. राखी मिळाल्यानंतरसुद्धा काही विचार करण्याची गरज आहे? ते तर बहिणीच्या रक्षणार्थ आगीत उडी मारण्याचं आमंत्रण आहे. राखीचं हे बंधन इतकं श्रेष्ठ आहे, की जिथं जाती, धर्म, देश यांच्या सीमा गळून पडतात. उरतात फक्त मानवतेच्या, प्रेमाच्या उच्चतम भावना. चला विचार करायला वेळ नाही. बहिणीचं नातं दुनियेतील सगळं सुख, संपत्ती आणि ताकदीपेक्षाही मोठं आहे. मी ह्या नात्याची इज्जत नक्कीच राखेन. ततारखान चला लवकर, फौजेला तयार करा. आम्ही लगेच कूच करणार आहोत. चला...'' हुमायून, ततारखान यांनी सैन्याबरोबर मेवाडकडे कूच केली. बंधू- भगिनी प्रेमातील विश्वास, आदर, बंधुता यांची साक्ष देण्यासाठी...!

☯☯☯

## मित्र प्रेम

कृपेश आपल्या मिांच्या घोळक्यात गप्पा मारण्यात दंग होता. आजच त्यांनी स्कॉलरशिपसाठी फॉर्म आणि फी भरली होती. स्कॉलरशिपचा अभ्यास आणि त्यासाठी शहरातील सर्वोत्तम क्लास ह्या मुलांनी लावला होता. प्रायव्हेट ट्युशनचा दर्जा आणि त्याची महागडी फी यावर मुलांची चर्चा रंगली होती. बोलता- बोलताच कृपेशचं लक्ष वर्गाच्या कोपऱ्यात शांत, खिन्न बसलेल्या संकेतकडे गेले. कृपेश पट्कन संकेतजवळ गेला आणि म्हणाला, ''काय झालं रे, असा शांत का बसलाय? चल आमच्यात गप्पा मारायला.''

संकेत नाराजीनेच म्हणाला, ''नको रे, बराय एकटा. जा तू.''

''अरे व्वा! हे बरंय, तूच सांग आपण एकमेकांना कधी एकटं सोडलंय का? तू नसलास की मला कशातच रस वाटत नाही. खरं सांग काय झालंय?''

''संकेत, काही नाही. तू जा.''

कृपेश हट्टालाच पेटला, ''तू येणार नसशील तर मीही कुठे जात नाही. काय झालंय सांग बरं?''

संकेतच्या डोळ्यांत पाणी तरळले. तो म्हणाला, ''स्कॉलरशिपचा फॉर्म आणि फी भरायचा उद्या शेवटचा दिवस आहे. आई अजूनही फीची व्यवस्था करु शकली नाही. परीक्षेला मला बसता येईल की नाही, याचीच काळजी लागलीय.''

कृपेश त्याची काळजी ओळखून समजावीत म्हणाला, ''चल, आज घरी गेल्यावर त्यावर काहीतरी तोडगा काढू. तू नाराज होऊ नको.''

संकेत हा कृपेशच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीचा मुलगा. संकेतला वडील नाही. हातावर पोट भरणाऱ्यांनी शिक्षणाचे मोठे स्वप्न पाहणे म्हणजे आकाशीचा चंद्र मागण्यासारखे होते. घरी आल्यावर संकेत खिन्नतेनेच आऊटहाऊसमधील आपल्या

छोट्याशा खोलीत पुस्तक उघडून बसला. पण, त्याचे कशातच लक्ष लागत नव्हते. आई कामाला गेली होती.

कृपेशने मात्र आपल्या बंगल्यातील एका हॉलवजा मोठ्या खोलीत जिथे वडिलांचे ऑफीस होते, तेथे लगेचच शाळेतून आल्या- आल्या प्रवेश केला. कामात व्यस्त असलेल्या पप्पांनी वर मान करुन आश्चर्याने विचारले, ''काय? आज स्वारी चक्क शाळेतून आल्या- आल्या ऑफीसमध्ये अवतरली. बोला काय काम काढलं?''

कृपेश वडिलांजवळ येऊन आजीजीने म्हणाला, ''पप्पा, मी स्कॉलरशिपचा फॉर्म भरला. पण, संकेतला मात्र फी भरणे अशक्य आहे. आपण त्याला शिक्षणासाठी मदत करू या. तो माझ्यापेक्षाही हुशार आहे आणि माझा प्रिय मित्र आहे. जर त्याला गरिबीमुळे शिकता आले नाही, तर मीही शिकणार नाही.''

वडिलांना आपल्या मुलाची आणि संकेतची निस्सिम मैत्री माहित होती. आपल्या मुलाच्या मनातील दुसऱ्याला मदत करण्याची भावना, कळकळ बघून त्यांचे हृदय भरुन आले. ते हसत- हसत कृपेशला म्हणाले, ''अरे, एवढंच ना? आजपासून संकेतच्या सर्व शिक्षणाची, खाण्या- पिण्याची, कपडे लत्त्यांची व्यवस्था आपण पाहू. मग तर तू खूश.!''

आपल्या पप्पांनी फक्त फीच नाही, तर संकेतच्या सर्व शिक्षणाची जबाबदारी उचलली, हे पाहून कृपेश अत्यानंदित झाला. खूष होऊन पप्पांच्या गळ्यात पडला. नंतर पळतच तो, ही बातमी संकेतला सांगण्यासाठी आऊटहाऊसमध्ये गेला. संकेतची आई कामावरून येऊन त्याला समजावत होती. पप्पांनी घेतलेला निर्णय कृपेशने हर्षभरीत होऊन त्या दोघांना ऐकवला. संकेतच्या आईने हात जोडून देवाचे आभार मानले. कृपेशला म्हणाली, ''तुझ्या वडिलांच्या रुपाने देवाचीच कृपा झाली बघ. या गरीब बाईची सगळी काळजीच मिटली.'' संकेतलाही खूप आनंद झाला.

कृपेश आणि संकेत बरोबरीने शिकू लागले. स्कॉलरशिप परीक्षेच्या यादीत दोघंही झळकली. पुढे दोघांनी उच्च शिक्षण घेतले. कृपेश आपल्या वडिलांना त्यांच्या कंपनीच्या कारभारात हातभार लावू लागला. संकेतची उच्च अधिकारी म्हणून दिल्लीत नोकरी सुरु झाली. दिवस जात होते. कृपेश आणि संकेत यांच्या प्रत्यक्ष भेटी-गाठी कमी कमी होऊ लागल्या. दोघंही आपल्या व्यापात व्यग्र झाली.

इकडे कृपेशच्या वडिलांचे भाग्य पालटले. अचानक कंपनीचे शेअर्स उतरल्यामुळे कंपनी डबघाईला आली. कर्ज वाढले. सगळं विकून कृपेशचं कुटूंब रस्त्यावर आलं. भिक मागण्याची वेळ आली. हा वज्राघात कृपेशचे वडिल सहन करू शकले नाहीत. ह्या धक्क्याने ते दगावले. अन्नाच्या कणा-कणासाठी कृपेश महागला. या सर्वांमुळे तो अतिशय गोंधळून गेला. त्याची मती भ्रमित झाली. त्याच्यावर ह्या सर्वांचा मानसिक परिणाम झाला. त्याच्या पत्नीला काही कळेनासे झाले. पती कृपेशला कसं सांभाळावं?

तिकडे दिल्लीत संकेत विचारात पडला. किती दिवस, महिने गेले. कृपेशने त्याच्या अनेक पत्रांचें उत्तरही दिले नाही. फोनही लागत नाही. कृपेशची त्याला काळजी वाटू लागली. तो स्वतःच मुंबईला आला. सगळी परिस्थिती त्याला कळाली. कृपेशला शोधण्यासाठी त्याने जंग जंग पछाडले. एका झोपडपट्टीत कृपेश आणि त्याच्या पत्नीचा ठावठिकाणा मिळाला. प्रत्यक्ष भेटीत संकेत कृपेशची गळाभेट घेत आनंदाने उद्गारला, ''मित्रा शेवटी सापडलास तू. अरे, काय अवस्था केलीस ही स्वतःची?'' परंतु कृपेशच्या डोळ्यांत कोणतेही ओळखीचे भाव उमटेनात. कृपेशची पत्नी म्हणाली, ''भाऊजी, यांना झाल्या गोष्टीचा जबर मानसिक धक्का बसलाय. तेव्हापासून अशीच तब्येत आहे ह्यांची.''

संकेतने दोघांनाही आपल्यासोबत दिल्लीला नेले. तेथे तज्ञ डॉक्टरांकडून कृपेशवर उपचार केले. हळूहळू काळ जसा पुढे सरकत होता, तसा कृपेशमध्ये बदल होऊ लागला. त्याची तब्येत सुधारली. तो मित्र संकेतला ओळखू लागला. दोघांच्या गप्पा रंगू लागल्या. कृपेश संकेतच्या प्रेमाने आणि उपचाराने पूर्वपदावर आला. परिवारात आनंद पसरला.

एक दिवस कृपेश संकेतला म्हणाला, ''मित्रा, तुझ्या प्रेमाने आणि पाहुणचाराने मी तृप्त झालो. माझी तब्येतीची तू जातीने काळजी घेतली. आता मी अगदी ठणठणीत बरा झालोय. मी असा किती दिवस तुझ्यावर बोजा बनून राहू. आता मला स्वतः हातपाय हलवले पाहिजेत. तेव्हा परवानगी दे.'' हे ऐकताच संकेत म्हणाला, ''मित्रा हे घर तुझेच आहे. अशी जायची भाषा का करतोस?''

''अरे जात नाही कुठे, पण काहीतरी काम धंदा तरी करावा म्हणतोय मी.'' कृपेश समजावत म्हणाला. संकेत आनंदून म्हणाला, ''व्वा! ही तर चांगलीच गोष्ट आहे. पुन्हा नव्या जोमानं. तू नवीन उद्योग धंदा सुरू कर.''

कृपेश काळजीने म्हणाला, ''उद्योगधंदा? पण, त्याला भांडवलाची आवश्यकता पडेल. तूही सरकारी नोकर, तेव्हा तुझ्याकडून मदतीची अपेक्षा करणे योग्य नाही.''

संकेत कृपेशच्या पाठीवर थोपटत म्हणाला, ''मित्रा, त्याची काळजी तू कशाला करतोस? मी नोकरीला लागलो तेव्हापासून माझ्या पगारातील निम्मी रक्कम तुझ्या नावाने बाजूला काढत आलो आहे. ते सर्व धन तुझेच आहे. तू माझ्या शिीणासाठी, सर्व गोष्टींसाठी शेयर केले. आता माझी वेळ आहे.'' हे ऐकून कृपेश गहिवरला. आपल्या मित्रप्रेमाची परिसीमा त्याला प्रत्यक्ष दिसली. कृपेश संकेतला मिठी मारत आनंदाने म्हणाला, ''दोस्ता, एवढं तरी कुणी आपल्या रक्ताच्या नात्यासाठीही करीत नाही. तू मात्र अगदी वेगळा निघालास. कृष्ण- सुदाम्याच्या मैत्रीची आठवण झाली.''

संकेत म्हणाला, ''सगळ्या नात्यांत मैत्री हे नातं अति उच्च कोटीचं आहे. बालपणी तू तुझ्यातली अर्धी भाकर मला भरवली. तुझी मैत्री, तुझं प्रेम मी कसा विसरू? तुला दुःखात, कष्टात पाहणं मला जमणार नाही. तुझं सर्व काही व्यवस्थित मार्गी लागेल, तेव्हाच मला समाधान मिळेल.'' मित्राचे हे बोल ऐकून कृपेशला गहिवरून आले. त्याने आपल्या मित्राला घट्ट मिठी मारली. मैत्री ह्या नात्यासारखे पवित्र, सुंदर, सत्य ह्या जगात दुसरे काही नाही.

☯☯☯